# प्रकरण चौथे

## कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचा

## उदय आणि विकास

## प्रकरण चौथे

## कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाचा

## उदय व विकास

कोल्हापूर जिल्हा हा सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या कोल्हापूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अशी की, पद्म पुराणातील करवीर खंडात कोल्हापूर क्षेत्राचे महात्म्य यथोचितपणे वर्णिले आहे. त्यावरुन या क्षेत्राचे प्राचीनत्व व पावित्र्य मान्यता पावले आहे. या क्षेत्रास "दक्षिण काशी" असेही म्हटले जाते. महालक्ष्मीच्या तीर्थक्षेत्रामुळे कोल्हापूर शहरात ऐतिहासिक काळापासून महत्त्व प्राप्त झाले आहे. पुराणामधील उल्लेखानुसार या परिसरास "करवीर" असेही संबोधत असत. कोल्हापूर हे नाव कसे पडले याबाबत निरनिराळया "दंतकथा आहेत. तथापि या नगराचे करवीर हे नाव अधिक प्राचीन असून कोल्हापूर, कोल्लापूर ही नावे नंतरच्या काळात प्रचलित झाली आहेत. [१]

इ.स. १८१८ मध्ये मराठा सत्तेचा -हास झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आला. इ.स. १८३७ मध्ये छत्रपती शाहाजी उर्फ बाळासाहेब महाराज वारल्यानंतर त्यांचा पुत्र शिवाजी उर्फ बाळासाहेब महाराज गादीवर आला. परंतु तो अल्पवयी असल्याने कारभार पहाण्यासाठी मेजर ग्रॅहॅम यांची पोलिटिकल एजंट म्हणून नेमणूक झाली. कोल्हापूर संस्थान १८४४ सालापर्यंत छत्रपतींच्या अधिपत्याखाली होते. इ.स. १८२९ मध्ये ब्रिटिश व भारतीय संस्थानिक यांच्यात झालेल्या तहानुसार १८४४ मध्ये ब्रिटिशांनी दाजीकृष्ण पंडित यांची कारभारी म्हणून नेमणूक केली. त्याने सर्व खालसा अंमलाचे विभाजन करुन प्रशासकीय सोईसाठी करवीर,

पन्हाळा, शिरोळ, आळते, गडहिंग्लज व भुदरगड असे सात तालुके निर्माण केले. कटकोळ व रायबाग ही ठाणी अनुक्रमे गडहिंग्लज व शिरोळ पेठ्यात समाविष्ठ केली. याशिवाय विशाळगड, बावडा, कागल, इचलकरंजी ही चार पोट संस्थाने त्यात सामील होती. आजरा तालुका इचलकरंजीकरांच्या ताब्यात होता. राज्यकारभाराच्या सोईसाठी कोल्हापूर जिल्ह्याचे एकूण १० उपविभाग केले होते. प्रत्येक विभागाचे सरासरी क्षेत्र ६४४.९१ कि.मी. होते व त्यात १०८ खेडी होती. [२]

अशा प्रकारची रचना दाजी कृष्ण पंडित याने निर्माण करुन तो कोल्हापूरच्या कारभारी या नात्याने कार्य करत होता. कारण बाबासाहेब हा अल्पवयी असल्याने दाजी कृष्ण पंडित कारभारी म्हणून कार्य करीत होता. ४ ऑगस्ट १८६६ या दिवशी बाबासाहेबांचे निधन झाल्यानंतर राजाराम महाराजांची निवड करण्यात आली. परंतु त्याचे ३० नोव्हेंबर, १८७० मध्ये निधन झाल्याने गादीचा वारस गेला. त्याच राजाराम महाराज निपुत्रिक वारल्याने, नारायणराव भोसले हे चौथे शिवाजी नावाने गादीवर बसले होते. परंतु त्यांचा २५ डिसेंबर, १८८३ रोजी मृत्यू झाला. त्यानंतर कोल्हापूर गादीला वारस म्हणून कागल पातीचे आबासाहेब घाटगे यांचे जेष्ठ पुत्र यशवंतराव याला गादीवर बसवण्यात आले. याचा दत्तक विधान समारंभ १७ मार्च, १८८४ रोजी मोठ्या थाटात संपन्न झाला होता. दत्तक विधानानंतर यशवंतराव यांचे नाव शाहू महाराज असे ठेवण्यात आले. शाहू महाराजांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी २ एप्रिल, १८९४ रोजी कोल्हापूर जिल्ह्याची अधिकारसूत्रे आपल्या हातात घेतली." [3] त्यानंतर त्यानी कोल्हापूर संस्थानात आपल्या कार्याला सुरवात केली. कोल्हापूर संस्थानची प्रगती व्हावी यासाठी शाहू महाराजांनी अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. संस्थानातील

संस्थानातील अस्पृश्यता नष्ट व्हावी व दलित, पिडित, मागासलेले वर्ग, भटके-विमुक्त, आदिवासी यांचे पुनर्वसन होऊन त्यांना समाजात चांगल्या प्रकारचा दर्जा प्राप्त व्हावा म्हणून त्यांनी विविध उपक्रम आपल्या संस्थानात राबविण्यास सुरवात केली. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी १९०८ साली "मिस क्लार्क" नावाचे वसतिगृह सुरु केले. या शिवाय शाहूंनी अस्पृश्यांना आपल्या संस्थानात पट्टेवाले, शिपाई, माहूत, कोचमन, ड्रायव्हर, अंगरक्षक इ. स्वरूपाच्या नोकऱ्या देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. सुशिक्षित अस्पृश्यांना त्यांनी वकिलीच्या सनदा बहाल केल्या. याच बरोबर निरनिराळ्या प्रकारचे अनेक पुरोगामी स्वरूपाचे कायदे करून त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांनी आपल्या देशात सर्वप्रथम अस्पृश्यांच्यासाठी ५० टक्के राखीव जागा नोकऱ्यामध्ये ठेवलेल्या होत्या.

अर्थातच शाहू महाराजांच्या या पुरोगामी कार्याला सनातनी लोकांनी फार मोठा विरोध दर्शविला होता. परंतु छत्रपती शाहू महाराज हे धाडसी होते. ते म्हणाले की, "दलितांच्या सेवेसाठी मला छत्रपतींचे सिंहासन सोडावे लागले तरी पर्वा नाही." ४ त्यांच्या प्रयत्नाने व पुढाकारानेच कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता नष्ट होऊन अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया समर्थ बनविण्याचे कार्य शाहू महाराज करत होते. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन, भास्कर गंगाराम कांबळे, पंजाबराव हुलस्वार, दा.म. शिर्के, गंगाधर यशवंत पोळ, फराजी कांबळे, प्रभु [illegible] कांबळे, [illegible] गुरु [illegible], के. डी.एस. पवार, के. गणेशाचार्य वकील हे अस्पृश्य समाजातील कार्यकर्ते तयार होऊन ते अस्पृश्य उध्दाराचे कार्य करत होते.

शाहू महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व पाठिंब्यामुळे दत्तोबा पवार यासारखे कार्यकर्ते अस्पृश्य समाजात निर्माण झाले. त्यांनी दत्तोबाची

कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. ते त्या जागेवर १९२० ते १९२५ पर्यंत कार्य करत होते. ते पुढे कर्तबगारीने मामलेदार व काँग्रेसचे आमदार झाले होते. अध्यक्ष पदावरील ही नेमणूकीची घटना कोल्हापूर संस्थानात त्याकाळी क्रांतिकारक ठरली होती. [५]

याच कालखंडामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च शिक्षण घेत होते. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणारे ते पहिले अस्पृश्य होते. त्यामुळे त्यांच्या शिक्षण कार्याची प्रशंसा वृत्तपत्रातून होऊ लागली होती. एकदा वर्तमान पत्रातील अशा प्रकारची बातमी वाचून शाहू महाराजांनी आश्चर्य वाटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी व्यक्ती विलायतेला जाऊन एम्.ए., पीएच्.डी. होऊन येते याचे आश्चर्य शाहूना वाटल्याने त्यांनी आपली माणसे मुंबईला डॉ. आंबेडकरांच्याकडे पाठवून दिली. नंतर स्वत: शाहू महाराज डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी मुंबईतील परळ विभागात गेले. तेथे शाहू महाराज व आंबेडकर यांची पहिली भेट घडून आली. [६]

यावेळी शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना कोल्हापूर भेटीचे निमंत्रण दिले. आंबेडकरांनी या आमंत्रणाचा स्विकार करुन ते लवकरच कोल्हापूरच्या भेटीस गेले. तेव्हापासून शाहू महाराज व आंबेडकर यांच्यात स्नेह निर्माण झाला.

कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य समाजातील नेते समाज जागृतीचे कार्य करतच होते. या सर्व नेत्यांनी डॉ. आंबेडकरांना कोल्हापूर जिल्ह्यातील "माणगाव" येथे आणून त्यांच्या अध्यक्षतेखाली पहिली अस्पृश्यांची परिषद घेण्याचे ठरवले. त्यानुसार कोल्हापूरातील अस्पृश्य पुढा-यांनी डॉ.आंबेडकरांशी

पत्रव्यवहार करून आंबेडकरांची कार्यक्रमासाठी संमती मिळवली व नियोजित कार्यक्रमाला हजर रहाण्यासाठी डॉ. आंबेडकर हे मुंबईहून माणगाव येथे २० मार्च, १९२० रोजी आले व त्यांच्या अध्यक्षतेखाली "अस्पृश्य परिषदेला" सुरवात झाली. या परिषदेला शाहू महाराजानाही निमंत्रित केले होते. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ मार्च रोजी शाहू महाराज हे परिषदेला हजर होते. या परिषदेत शाहू महाराजांचे ऐतिहासिक भाषण झाले. या भाषणात ते म्हणाले की, माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे आपल्या समाजाबरोबर देशाचाही उद्धार करतील एवढेच नव्हे तर एकवेळ अशी येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखा विद्वान महाराष्ट्रात जन्माला आला ही घटना देशहिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे." त्यानंतर ते आंबेडकरांना उद्देशून म्हणाले की, "आता इथून पुढे तुम्हीच अस्पृश्यांच्या हितासाठी कार्य सुरु करा." ७

शाहू महाराजांच्या या ऐतिहासिक भाषणामुळे डॉ. आंबेडकरांना आपल्या कार्याची स्फूर्ती मिळाली व ते सार्वजनिक क्षेत्रात कार्य करु लागले.

माणगाव परिषदेनंतर डॉ. आंबेडकर यांनी ९ मार्च, १९२४ रोजी "बहिष्कृत हितकारिणी सभा" या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेद्वारे डॉ. आंबेडकरांनी दलित उध्दारासाठी कार्य सुरु केले. संस्थेचा पहिला उपक्रम म्हणून त्यांनी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांच्यासाठी खुले करण्याचा व त्यासाठी संघर्ष करण्यास सुरवात केली. कालांतराने हा लढा यशस्वी करण्यात आला होता.

"बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेच्या माध्यमाने डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात जागृती निर्माण केली. या संस्थेद्वारे निरनिराळी वसतिगृहे व

शाळा सुरु करण्यात आल्या. याद्वारे अस्पृश्य समाज जागृत होऊन समाजाकडे डोळस दृष्टीने पाहू लागला होता. शाहू महाराजांनीही कोल्हापूर संस्थानात वसतिगृहे सुरु केली होती.

त्यानंतर ३ फेब्रुवारी १९२८ रोजी "सायमन कमिशन" भारतात आले होते. या कमिशनला डॉ. आंबेडकरांच्यावतीने एक निवेदन सादर करण्यात आले होते. या कमिशनला कॉंग्रेसने विरोध केल्याने कमिशन संपन्न न होता ब्रिटिशांनी "गोलमेज परिषद" लंडन येथे आयोजित केली. या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांना आमंत्रित केले होते. त्यांच्या भाषणामुळे अस्पृश्यांना या परिषदेत "स्वतंत्र मतदार संघ" मिळाला. परंतु त्या विरुध्द म. गांधीनी उपोषण सुरु केले. त्यातून पुणे करार घडून आला. या पुणे कराराच्या वेळी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांनी डॉ. आंबेडकरांना पाठिंबा व्यक्त केला होता एवढी जागृतता कोल्हापूर संस्थानात आली होती.

त्यानंतर १९३५ साली ब्रिटिशांनी भारतीयांसाठी एक व्यापक कायदा लागू केला होता. या कायद्यानुसार ब्रिटिशांनी निवडणुका घ्यायच्या ठरवल्या होत्या. त्यांमुळे भारताच्या राजकीय जीवनात अस्पृश्यांना स्थान असावे व अस्पृश्यांना राजकारणात सहभागी होता यावे म्हणून १५ ऑगस्ट १९३६ रोजी आंबेडकरांनी "स्वतंत्र मजूर पक्षाची" स्थापना केली.

परंतु स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्यालय मुंबईला होते. तसेच त्याचे कार्यक्षेत्र मुंबई प्रांतापुरतेच मर्यादित स्वरूपाचे होते. परंतु मुंबईबाहेरील प्रांतामध्ये हा प्रश्न लोकप्रिय झाला नाही. [8]

परिणामी हा प्रश्न कोल्हापूर संस्थानात देखील रुजू शकला नाही आणि कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य लोकांनी या पक्षाकडे व्यापक दृष्टी-

कोनातून पाहिले नाही. स्वतंत्र मजूर पक्ष हा १९३६ ते १९३९ पर्यंत मर्यादित शहरापुरता अस्तित्वात होता. नंतरच्या काळात या पक्षाचे कार्य थंडावत चालले होते.

१९४२ साली "सर स्ट्रफर्ड क्रिप्स" यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्ट-मंडळ भारतात आले होते. या शिष्टमंडळाने आंबेडकरांशी चर्चाही केली होती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी "स्वतंत्र मजूर पक्ष" बरखास्त करुन "शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" नावाचा पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली व १७ जुलै, १९४२ रोजी नागपूर अधिवेशनात शेडयूल कास्ट फेडरेशन" या पक्षाची स्थापना करण्यात आली.

✓ या पक्षामध्ये कोल्हापूर संस्थानातील दलित सामील झाले. दा.म. शिर्के, मा.ई. कुरणे, रतन कांबळे, स.म. काळे, भुजंगराव कांबळे, नरसिंह कांबळे इत्यादी नेत्यांच्यामार्फत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्य कोल्हापूर संस्थानात सुरु झाले.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली एक घटना परिषद नियुक्त करण्यात आली. त्यावेळी हंगामी सरकार भारतामध्ये निर्माण झाले होते. पंतप्रधान म्हणून "जवाहरलाल नेहरु झाले होते. घटना परिषदेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नियुक्ती झाली होती. या घटना समितीने २६ जानेवारी, १९५० पासून घटनात्मक कारभाराला सुरवात केली.

१९४७ ते १९५२ पर्यंत हंगामी मंत्रिमंडळाने कार्य केल्यानंतर १९५२ साली भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. या निवडणुकीत

शेडयुल्ड कास्ट फेडरेशानने आपले उमेदवार उभे केले होते. "परंतु या निवडणुकीमध्ये सवर्ण हिंदूनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशानच्या उमेदवाराला मतदान न करता कॉंग्रेसला मतदान केल्यामुळे राखीव जागेवर कॉंग्रेसचेच उमेदवार निवडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देखील काजरोळकर सारख्या कॉंग्रेस उमेदवाराकडून पराभव पत्करावा लागला. लोकसभेवर सोलापूर मतदार संघातून शेडयूल्ड कास्ट फेडरेशानचे सेक्रेटरी पी.एन्. राजभोज निवडून आले. तसेच हैद्राबाद प्रांतातील करिमनगर लोकसभा मतदार संघातून श्री एम्.आर. कृष्णान् निवडून आले. अशा रीतीने शेडयूल्ड कास्ट फेडरेशानचे दोन सदस्य लोकसभेवर निवडून आले. होते." [९]

इ.स. १९५२ ते ५७ या काळात कोल्हापूर जिल्हयात शेडयूल्ड कास्ट फेडरेशानचे कार्य अत्यंत जोमात चाललेले होते.

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या निवडणुकीसाठी श्री ढिगे शंकर खंडेराव यानी हातकणंगले तालुका उत्तर भाग मतदार संघातून राखीव जागेवर उमेदवारी जाहीर केली होती. या निवडणूकीत कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशान व शेतकरी कामगार पक्ष यांनी निवडणूकीसाठी परस्पर सहकार्य देण्याचा करार केला होता. या निवडणूकीत ढिगे यांचे निवडणूक चिन्ह "हत्ती" हे होते. या काळात मा.ई. कुरणे हे कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशानचे जनरल सेक्रेटरी होते. तर दा.म. शिर्के हे कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशानचे अध्यक्ष होते व स्वत: ढिगे हे कोल्हापूर शहर दलित फेडरेशानचे अध्यक्ष होते. [१०]

कोल्हापूर जिल्हयात प्रथमपासूनच दलित फेडरेशान या पक्षाने शेतकरी कामगार पक्षाशी युती केलेली दिसते. या निवडणुकीत ढिगे शंकर खंडेराव यांचा विजय झाला होता.

त्यानंतर दि. १४/२/१९५४ रोजी कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशन-च्या माध्यमाने शिरोळ तालुका दलित फेडरेशनची बैठक कुरुंदवाड येथे बोलावली होती. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशनचे सह-चिटणीस एस्.एम्. कांबळे यांचे नाव निश्चित झाले होते. [११] त्यानुसार ही बैठक पूर्ण झाली. या बैठकीस सुमारे ४७ खेडयातील अस्पृश्य जनता मोठया संख्येने हजर राहिली होती. [१२]

या परिषदेत निरनिराळया नेत्यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या भाषणात पक्षाचे कार्य व कोल्हापूर जिल्हयातील समस्यांचा आढावा घेण्यात आला. या परिषदेला एस्.एम्. कांबळे, एस्.के. डिगे, जिल्हा उपा-ध्यक्ष भुजिंगराव कांबळे, जिल्हा सरचिटणीस मा.ई. कुरणे, कोल्हापूर शहर शाखेचे अध्यक्ष शामराव जाधव, कागल तालुका दलित फेडरेशनचे अध्यक्ष चिंतामणराव कांबळे व सेक्रेटरी रतन कांबळे व करवीर तालुका दलित फेडरेशनचे सेक्रेटरी विठ्ठल भास्कर इत्यादी कार्यकर्ते हजर होते. [१३]

या परिषदेत खालील ठराव मांडून ते सर्वानुमते पास करण्यात आले होते.

१) सर्वसाधारण जनमताचा कानोसा घेऊन व पक्षाचे वाढते कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदेश दलित फेडरेशनच्या आदेशानुसार शिरोळ तालुका दलित फेडरेशनचे खालील अधिकारी निवडण्यात यावेत. या पदाधिका-यांची मुदत एक वर्षाची असावी. तसेच एक महिन्याच्या आत त्यानी तालुका वर्किंग कमिटीची नावे जिल्हा कमेटीकडे पाठविणेची तरतूद करावी.

<u>पदाधिका-यांची नांवे</u> - अध्यक्ष - श्री सिद्राम धर्माजी कांबळे

उपाध्यक्ष - श्री दशरथ गणोजी कांबळे

सेक्रेटरी " श्री बंडू कृष्णा कांबळे

सहसेक्रेटरी - श्री दत्तु शिवाप्पा गोरे

२) मराठवाडा जमीन सत्याग्रह यशस्वी करण्याचे कामी महाराष्ट्र प्रदेश दलित फेडरेशनचे अध्यक्ष कर्मवीर दादासो गायकवाड व मराठवाडा दलित फेडरेशनचे अध्यक्ष भाऊसो मोरे व त्यांचे सहकारी सत्याग्रही यांनी जो अतुल स्वार्थत्याग व चिकाटी दाखविली त्याबद्दल ही परिषद त्यांचे हार्दिक अभिनंदन करते.

३) कोल्हापूर जिल्हयातील देवस्थान मंडळाची व्यवस्था कोल्हापूर जिल्हा लोकल बोर्डाने निवडलेल्या लोकनियुक्त मंडळाकडून काढून घेऊन ती सरकार नियुक्त समितीकडे देऊन लोकशाहीस बगल दिली आहे. एकतर्फी सरकारने निर्णय घेतलेला आहे. या बद्दल कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशनच्या विद्यमाने भरलेल्या शिरोळ तालुका दलित परिषदेस दिलगिरी वाटते.

४) श्रीमंत छत्रपती महाराज शहाजीराजे कोल्हापूर यांचेकडून सरकारने त्यांचे-कडे असलेल्या जमिनीपैकी साडेबारा हजार एकर जमीन आपल्या ताब्यात घेतली आहे. त्या जमिनीचे वाटप करतेवेळी अस्पृश्य समाजास प्रथम संधी दिली जावी त्याकरिता वाटप समितीत अस्पृश्यांची प्रातिनिधीक संस्था जी दलित फेडरेशन यांचा एक प्रतिनिधी घेतला जावा अशी ही परिषद सरकारला सुचविते.

५) सरकारच्या मालकी हक्काच्या पड जमिनी व सरकारमार्फत मागणी लिलाव होत असलेल्या जमिनी तांत्रिक मुद्दयावर अस्पृश्यांना दिल्या जात नाहीत. अशा तक्रारी असलेने सरकारने याबाबतीत लक्ष घालून अशा जमिनी लागवडीस देणेची दक्षता घ्यावी अशी ही परिषद मागणी करते.

६) अस्पृश्य समाजाच्या वसाहतीच्या अडचणी लक्षात घेऊन सरकार हक्कातील किंवा वसाहतीस योग्य असलेली जागा अक्वायर करून अस्पृश्यांच्या

वसाहतींचा प्रश्न झटपट सोडवावा. तसेच अस्पृश्य समाजाच्या वसाहतीची कामे सरकारच्या दप्तरात पडलेली आहेत त्याचाही निर्णय लवकरात लवकर घेण्याबद्दल संबंधित अधिका-यांना सरकारने जरूर ते हुकूम द्यावेत अशी या परिषदेची सरकारकडे आग्रहाची मागणी आहे.

७) सरकारच्या नोकर कपातीची झळ अस्पृश्य व मागासलेल्या नोकरांना लागली आहे. असे आमच्या निदर्शनास आले आहे. त्याबाबतीत सरकारने नवीनच केलेल्या जी.आर. प्रमाणे अस्पृश्य नोकर लोकांची कपात केली जाऊ नये. याबाबतीत सरकारने जरूर ते लक्ष घालावे अशी ही परिषद सरकारला विनंती करीत आहे.

८) सरकारी व निमसरकारी संस्थेत अस्पृश्य व मागासलेल्या नोकर लोकांचे क्लास ३ व ४ चे नोकरीतील प्रमाण अत्यंत अल्प आहे असे आमच्या निदर्शनास आले आहे. सरकारच्या धोरणानुसार शेकडा २० टक्के प्रमाणे नवीन भरती केली जाते. परंतु पूर्वीचे प्रमाण मुळून निघत नसल्याने नवीन भरतीचे प्रमाण वाढवून देण्यात यावे अशी या परिषदेची मागणी आहे.[१४]

वरील प्रकारचे ठराव या परिषदेत मंजूर करण्यात आले होते. या परिषदेनंतर कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशनची बैठक कागल येथे रविवार तारीख २८ मार्च, १९५४ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून कोल्हापूर जिल्हा स्कूल बोर्डाचे व्हाईस चेअरमन श्री मा.ई. कुरणे यांचे नाव निश्चित केले होते.[१५]

त्यानंतर हातकणंगले तालुका दलित परिषद व कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशनची मध्यवर्ती बैठक हातकणंगले तालुका दलित फेडरेशनचे माननीय अध्यक्ष

चिंतामरणराव नारायण कांबळे इचलकरंजीकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.५.१९५४ रोजी मु. कोरोची, ता. हातकणंगले येथे घेण्याचे निश्चित केले होते. या परिषदेचे उद्घाटन बॅ. बापूसाहेब कांबळे यांच्या हस्ते केले होते. [१६]

त्यानंतर गडहिंग्लज तालुका दलित परिषद, कोल्हापूर जिल्हा दलित फेडरेशनचे अध्यक्ष मा. एस्.के. डिगे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५.५.१९५४ रोजी घेणेचे निश्चित करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन दलित फेडरेशनचे प्रधानमंत्री खासदार बापूसाहेब राजभोज यांच्या हस्ते होते. [१७]

अशा विविध परिषदा इ.स. १९५२ ते इ.स. १९५७ या कालखंडात घेण्यात येत होत्या. शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हा डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेल्या पक्ष कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात कार्यरत ठेवण्याचे कार्य दलित लोकांनी व पुढा-यांनी केले होते. परिषदा, व्याख्याने, भाषणे, मेळावे इत्यादी आयोजित करुन दलित समाज आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टया प्रगत व्हावा. दलित समाजास संघटनेचे महत्व समजावे, संघटित राहून दलितांचा सर्वांगीण विकास घडवून आणता येतो हे लोकांना समजावून देणे ही कार्ये दलित फेडरेशन हा पक्ष करीत होता. सर्वात महत्त्वाचे या पक्षाचे कार्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कोल्हापूर जिल्हयातील संपूर्ण दलित समाजापर्यंत पोहचविणे होय. हे कार्य अतिशय उत्साहाने व निस्वार्थीपणे या कालखंडात चाललेले होते.

१९५७ साली भारतात दुस-या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या होत्या. या निवडणुकींच्या आधीदरच्या वर्षी म्हणजे ६ डिसेंबर, १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले होते. १९५२ च्या निवडणूकीत शेडयूल्ड कास्टला फार मोठे अपयश प्राप्त झाले होते. त्यामुळे

राष्ट्रीय पातळीवर हा पक्ष निराशावादी बनलेला होता. या काळापासूनच दलित समाज हा इतर राजकीय पक्षाकडे आकृष्ट होत चाललेला होता. संयुक्त मतदार संघाची निर्मिती झाल्यामुळे दलित समाजातील लोक शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन मध्ये न रहाता काँग्रेस पक्षाकडे जाऊन निवडून येत होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना दलित फेडरेशन हा पक्ष बरखास्त करावा व त्याजागी सर्व समावेशक असा "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" या पक्षाची निर्मिती करावी असे वाटत होते. परंतु त्यांचे हे स्वप्न पूर्ण होण्याचा अगोदर त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याना या पक्षाची स्थापना करता आली नाही.

याच कालावधीमध्ये १९५७ साली भारतात दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्याच नावाखाली या निवडणूका लढविण्याचे ठरविले होते. या निवडणूकीत २० जानेवारी १९५७ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने आपले उमेदवार म्हणून कोल्हापूर जिल्हा राखीव लोकसभा जागेसाठी श्री एस.के. डिगे व दा.म. शिर्के यांना भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या पार्लमेंटरी बोर्डाकडून तसे लेखी कळविण्यात आले होते. [१८]

२५ मार्च, १९५७ रोजी निवडणूकीचा निकाल अधिकृतपणे घोषित केला व हे दोघेही उमेदवार निवडणूकीत विजयी झाले. [१९]

त्यानंतर दि. ३.९.१९५७ रोजी नागपूर येथे भरलेल्या दलित फेडरेशनच्या अधिवेशनात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त होऊन "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" नावाचा पक्ष निर्माण करण्यात आला. त्यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व शेड्यूल्ड कास्टमधील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.

रिपब्लिकन पक्षाचे कोल्हापूरातील आमदार दा.म. शिर्के हे १९५७ ते त्यांच्या मृत्यूपर्यंत २६ डिसेंबर, १९८५ पर्यंत रिपब्लिकन पक्षाचे कार्य करत होते. रिपब्लिकन पक्षाचे आमदार या नात्याने त्यानी विधानसभेत निरनिराळया भूमिका व प्रश्न मांडले आहेत. याशिवाय कोल्हापूर जिल्हयासाठीही त्यांनी कार्ये रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून केली आहेत. रिपब्लिकन पक्षाची स्थापना होण्याअगोदर ते शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्य करत होते. रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर ते दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून कार्य करू लागले होते.

१३ मे, १९५९ रोजी आ. शिर्के अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनाला निमंत्रणावरून औरंगाबादला गेले होते. या अधिवेशनाला जाणारे ते एकमेव कोल्हापूर जिल्हयातील नेते होते. [२०]

रिपब्लिकन पक्षाचे आमदार या नात्याने काम करत असताना त्यानी विधानसभेत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने निरनिराळे प्रश्न मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. "महाराष्ट्र विधानसभेत असताना दादासाहेबांनी प्रत्येक अधिवेशनावेळी शिवाजी युनव्हर्सिटीच्या स्थापनेबाबत निमसरकारी ठराव पाठवले. एकवेळी त्यांचा हा ठराव विधानसभेत चर्चेस आला त्यावेळी मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी दादासाहेबांना आपला ठराव मागे घ्या. शासकीय ठराव आम्ही लवकरच मांडीत आहोत असे आश्वासन दिले होते. पुढे त्याप्रमाणे शिवाजी युनव्हर्सिटीची स्थापना झाली. पण या कामी दादासाहेबांचे कार्य म्हणजे पायातील दगडासारखे आहे. [२१]

रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनातील ठरावाप्रमाणे १९५८ पासून नाशिक, धुळे, जळगाव अहमदनगर वगैरे जिल्हयात दादासाहेब गायकवाड

यांच्या नेतृत्वाखाली भूमीहिनांचा सत्याग्रह करण्यात आला होता. या सत्याग्रहात अनेक कार्यकर्त्यांना अटक झालेली होती. त्यावेळी म्हणजे दि. ११.९.१९५९ रोजी विधानसभेत दा.म. शिर्के म्हणाले की, पश्चिम खानदेश, नाशिक तसेच नगर जिल्हयात सध्या चालू असलेला भूमीहिनांचा सत्याग्रह हा खरोखर करुणाजनक घटना आहे. या सत्याग्रहात अडीच हजारांहून अधिक लोकांना अटक झाली आहे. असे माननीय मुख्यमंत्री हे स्वत: एका शेतक-यांचे सुपुत्र आहेत आणि त्यांच्या आमदाणीत भूमिहिनांचा प्रश्न सुटू नये ही गोष्ट खेदजनक आहे. [२२]

७ मार्च, १९५८ रोजी विधानसभेत त्यानी अंदाज पत्रकावर भाषण केले होते. विविध प्रश्नावर त्यांनी आपले विचार विधानसभेत माडून त्यानी रिपब्लिकन पक्षाचे कार्य चालविले होते.

कोल्हापूर जिल्हयातील खासदार एस्.के. डिगे यांनी लोकसभेत रिपब्लिकन पक्षाचे कार्य केले होते. लोकसभेत त्यानी अनेक महत्वपूर्ण प्रश्नावर आपली विविध प्रकारची मते व्यक्त केलेली आहेत. "रिपब्लिकन पक्षाचे खासदार बी.सी.कांबळे यांनी एक महत्वपूर्ण ठराव माडला होता. त्या ठरावाला माननीय खासदार डिगे यांनी अनुमोदन देऊन पुढील प्रकारचे विचार प्रगट केले होते. ते लोकसभेत म्हणाले की, "बौध्दांच्या न्याय्य हक्कासाठी सध: सरकारने केंव्हाच दखल घेतली नाही. त्याना त्यांचे पूर्वीचे न्याय्य हक्क दिले नाहीत. त्यामुळे समाजातील एका विभागात असंतोष व खळबळ माजण्याचा संभव आहे आणि त्यावेळी एकूण सर्व समाजात ही गोष्ट धोका पोहचवणारी व हाणीकारक आहे." [२३]

रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अशा विविध भूमिका खासदार व आमदार या नात्यानी प्रतिनिधीनी मांडलेल्या होत्या. व कोल्हापूर जिल्हयातील प्रतिनिधित्व यादोघानीही विधान सभेत व लोकसभेत केले होते. या प्रतिनिधींच्या

प्रमाणेच कोल्हापूर जिल्हयातील दलित समाजाचे अनेक नेते व पुढाऱ्यानी दलित समाजाच्या जागृतीचे व संघटनेचे कार्य केले आहे. त्यामध्ये मा.ई. कुरणे यांचा समावेश होतो. डॉ. बाबासाहेब यांचा पक्ष व त्यांची विचारसरणी कोल्हापूर जिल्हयात दलित समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यानी केले होते. गौरव अंकाला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की, बाबासाहेबांच्या पश्चात आम्ही कर्मवीर दादासाहेब गायकवाड याचे नेतृत्व स्विकारुन आम्ही काम करायला लागलो, रतन कांबळे हे आमचे अध्यक्ष होते आणि मी चिटणीस होतो. दरम्यान फुटीच्या बातम्या येऊ लागल्या. दुरुस्त रिपब्लिकन पक्ष निघाल्याचे ऐकिवात येऊ लागले. दरम्यानच्या काळात पक्षाची एक बैठक औरंगाबादला भरली. मी त्या बैठकीला उपस्थित होतो. त्या परिषदेला एन्.शिवराज आलेले होते. रितसर पक्षाची स्थापना झाली. त्याला कडाडून विरोध बी.सी. कांबळे यांनी केला. तरीही आम्ही दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली काम करीतच राहिलो. दरम्यानच्या काळात निवडणूकांच्या संदर्भात दादासाहेब गायकवाड यानी घेतलेली भूमिका काही मनापासून पटत नव्हती. पटली नाही. म्हणून त्यानंतर आम्ही बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या समवेत काम करावयाला सुरवात केली. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही बराच काळ कार्य केले. त्यांच्या निर्वाणामुळे त्याच तोलामोलाचा नेता कोण ? म्हणून आम्ही गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करावयास प्रारंभ केला. कोल्हापूर जिल्ह्यात खोब्रागडे गट आणि गवई गट यांचा आम्ही यशस्वी समझोता केला. दोन्ही गटाची एक बॉडी तयार केली. त्याला गवई साहेबानी मान्यता दिली होती. [२४]

रिपब्लिकन पक्ष गवई गट यांच्या माध्यमाने त्यांचा कोल्हापूर जिल्हयातील अनेक शैक्षणिक व गृहनिर्माण संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते जिल्हा बँकेचे संचालक व कोल्हापूर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे

(गवई गट) अध्यक्ष होते. महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा दक्षता समितीवर ते क्रियाशील सदस्य म्हणून अनेक वर्षे कार्य करत होते. जिल्ह्यात झालेल्या दलित व बिगर दलित चळवळीत ते सहभागी झाले होते.[२५] व रिपब्लिकन पक्षाचे कार्य करत होते.

मा.ई. कुरणे यांच्या बरोबरच रतन बाळू कांबळे रिपब्लिकन पक्षाचे आघाडीचे नेते व कार्यकर्ते होते. पक्ष निष्ठेबाबत अगदी विद्यार्थी दशेत असल्यापासून ते कार्यरत होते. १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची निर्मिती झाल्यापासून ते क्रियाशील कार्यकर्ते म्हणून कार्य करत होते. १९६० साली त्यांची पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाली. त्यानंतर ते सुमारे १५ ते १६ वर्षे अध्यक्ष म्हणून निर्विवादपणे कार्य करत होते. ते गावच्या ग्रामपंचायतीच्या राजकारणातही भाग घेत होते. १९५७ ते १९७२ पर्यंत ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. १९५७ ते १९६३ या कालावधीत त्यांची डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. या काळात सुमारे एक हजार ते बाराशे मागासवर्गीय शिक्षकांना नोक-या मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९६२ ते १९७२ या कालावधीत जिल्हा परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले. कोल्हापूरला आकाशवाणी केंद्र होण्याचा ठराव मांडून तो मंजूर करून घेतला होता. अनेक गावात त्यांनी बॅकवर्ड क्लास हौसिंग सोसायटयाही स्थापन केल्या आहेत.[२५]

मा.एस.के. डिगे, दा.म. शिर्के, रतन कांबळे, मा.ई. कुरणे, स.म. काले, भुजंगराव कांबळे, चिंतामणराव कांबळे इत्यादी नेत्यांनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशन व रिपब्लिकन पार्टी कोल्हापूर जिल्ह्यात गतिमान करण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या कर्तृत्वाने व विचाराने भारावलेली ही मंडळी आपला पक्ष कोल्हापूर जिल्ह्यात रुजवण्याचा प्रयत्न

करत होती. १९५९ साली रिपब्लिकन पक्षात पहिली फूट पडून दुरुस्त रिपब्लिकन पक्ष व नादुरुस्त रिपब्लिकन असे पक्षात दोन गट निर्माण झाले होते. परंतु कोल्हापूर जिल्हयातील दलित नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी पक्षात फूट न पाडता एकत्रपणे जागृतीचे कार्य केलेले दिसते. रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर ते आजपर्यंत रिपब्लिकन पक्षात अनेक गट व तट निर्माण झाले आहेत. याचा परिणाम ही कोल्हापूर जिल्हयात झालेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या बरोबर कार्य करणारी पहिली पिढी राष्ट्रीय पातळीवर व कोल्हापूर जिल्हयात संपुष्टात येत असतानाच रिपब्लिकन पक्षाच्या दुसऱ्या पिढीकडे रिपब्लिकन पक्षाची सूत्रे जात आहेत. सध्याच्या काळात राष्ट्रीय पातळीवर अनेक रिपब्लिकन पक्षाचे गट अस्तित्वात आहेत.

१) अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट)
२) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)
३) रिपब्लिकन पक्ष (कांबळे गट)
४) रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे गट)
५) भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट)
६) दलित मुक्ती आघाडी (जोगेंद्र कवाडे गट)

असे अनेक गट नेत्यांच्या नावे तयार झाले आहेत. ही रिपब्लिकन पक्षाची दुसरी पिढी आहे. राष्ट्रीय पातळीवर जसे अनेक गट आहेत त्याच प्रकारे कोल्हापूर जिल्हयातही रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट अस्तित्वात आले आहेत. उदा -

१) अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) जिल्हाध्यक्ष पी.एस. कांबळे.
२) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष मंगलराव माळगे.

३) भारतीय रिपब्लिकन पक्षा (प्रकाश आंबेडकर गट) जिल्हाध्यक्षा जालंदर जमादार.

४) रिपब्लिकन पक्षा (कांबळे गट) जिल्हाध्यक्षा ॲड. सुदर्शनी.

५) दलित मुक्ती सेना (जोगेंद्र कवाडे) जिल्हाध्यक्षा दगडू भास्कर.

असे निरनिराळे गट व तट रिपब्लिकन पक्षात निर्माण झालेले आहेत. त्यामुळे या पक्षाची शक्ती विस्कळीत झालेली आहे. या गटा-तटाच्या राजकारणाला कंटाळून व नेत्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे दलित समाजातील विशेषत: कोल्हापूर जिल्हयातील फार मोठा दलित समाज हा कॉंग्रेस व इतर राजकीय पक्षाकडे वळलेला आहे. त्यामुळे शाहू महाराजांचा वारसा लाभलेल्या कोल्हापूर जिल्हयात व डॉ. आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव असलेल्या कोल्हापूर जिल्हयात दलित समाज हा राजकीय दृष्टया दुभंगलेला आहे. त्यामुळे या पक्षाकडे फार लोक आकर्षित होत नाहीत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्षा कोल्हापूर जिल्हयात कसा निर्माण होऊ शकेल हा प्रश्न आहे. रिपब्लिकन पक्षाबाबत विविध गटातील नेते विविध मते मांडत आहेत. त्यांच्यात विविध मतप्रवाह निर्माण झालेले आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) राज्य कार्यकारिणी सदस्य बाबासाहेब वडगावकर या पक्षाबाबत म्हणाले की, प.पु. भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घोषणा केली असल्याने या पक्षाचे वैचारिक अधिष्ठान बुद्ध, फुले, चार्वाक, आंबेडकर व पेरियार या महामानव पुरुषांचे लाभलेले आहे. आपला भारत देश अनेक भाषा प्रांत, चालीरुढी, परंपरा यानी व्यापला आहे. या सर्वांना न्याय देणारा भविष्य काळात "रिपब्लिकन पार्टी" ही एकमेव पर्याय आहे. म्हणूनच आमच्या पक्षाचे भवितव्य उज्ज्वल आहे. [२६]

तर रिपब्लिकन पक्षाबाबत बोलताना अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे (गवई गट) राज्य कार्यकरणी सदस्य बी.डी. ठिकपुर्ले म्हणाले की, रिपब्लिकन

पार्टीबाबत मी आशावादी आहे. सध्याच्या राजकीय वातावरणावर निराशेचे ढग वाढले आहेत. परंतु ते जातीयवादी, धर्मांध आणि आपमतलबी आहे. हे कळावयास काही काळ जावयास हवा. डॉ. आंबेडकर यांची दृष्टी संकुचित नव्हती. भविष्यकाळाच्या भिंती पार करुन ती जात होती. आपण पार्टीच्या सामाजिक, आर्थिक, सहकारी क्षेत्रातील कार्य, धार्मिक परिवर्तन, साहित्य प्रगती या गोष्टींचा विचार करावा. तर प्रचंड प्रगती या पक्षाने केलेली दिसेल. [२७]

रिपब्लिकन पक्षाबाबत रिपब्लिकन पक्ष कांबळे गटाचे सदस्य म. भि. धर्मरक्षी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित मुक्तीसाठी व दलितांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अस्तित्वासाठी लढणारी संघटना, पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेचा विचार केला होता. दलितांना प्रस्थापितांच्या व भांडवलदारांच्या हस्तक पक्षाकडून न्याय्य हक्क मिळणार नाहीत याची खात्री पटल्यानंतर ह्या राजकीय पक्षाच्या स्थापनेबाबत बाबासाहेब प्रयत्न करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या मानवमुक्तीचा लढा केवळ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच देऊ शकेल. [२८]

तर रिपब्लिकन पक्षाबाबत बोलताना भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट) जिल्हाध्यक्ष जालंदर जमादार म्हणाले की, भारतातील लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सर्व आघाडयावर लढण्यासाठी तुल्यबळ म्हणून रिपब्लिकन पक्षाची आवश्यकता आहे. आणि हा पक्षच ख-या अर्थाने लोकांना न्याय देईल. [२९]

तर या पक्षाबाबत बोलताना एक सामाजिक कार्यकर्ते एस्. के. कांबळे म्हणाले की, रिपब्लिकन पक्षात अनेक गट असल्याने या पक्षाबाबत निराशा वाटत आहे. योग्य समाज हिताच्या नेतृत्वाचा अभाव दिसून येतो. काळाची

गरज लक्षात घेऊन एक एकसंध पक्ष भविष्यकाळात व्हावा ही अपेक्षा.[30]

तर रिपब्लिकन पक्षाबाबत आपले मत व्यक्त करताना दलित मुक्ती आघाडी (जोगेंद्र कवाडे) गटाचे सदस्य प्रा. अशोक बळी कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ज्या हेतूने या पक्षाची स्थापना करावयाची होती ते ध्येय त्यांच्या अनुयायानी बाजूला ठेवले आणि पक्ष अनेक गटात विभागला गेला. त्यात आठवले, कवाडे, ढाले, गवई, आंबेडकर असे अनेक नेत्यांचे अस्थिर नेतृत्व पक्षास लाभले. त्यामुळे दलित समाजामध्ये या पक्षाबाबत उदासिनता आढळते.[31]

अशी विविध मते कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या व इतर लोकांनी व्यक्त केलेली दिसतात. डॉ. आंबेडकर यांना देशात जातीयवादी पक्षाची आवश्यकता न राहिल्याने व संपूर्ण शोषितांना चांगल्या प्रकारे दिशा देण्यासाठी व प्रबळ विरोधी पक्षाच्या माध्यमाने कार्य करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना करावयाची होती. या द्वारे दलित समाज एक दिवस राज्यकर्ती जमात बनेल असा आशावाद डॉ. आंबेडकरांनी प्रगट केला होता. परंतु रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर अवघ्या दोनच वर्षात राष्ट्रीय पातळीवर पक्षात फूट पडून दोन गट निर्माण झाले. त्यानंतर नेत्यांच्या स्वार्थी वृत्तीने, पदाच्या अपेक्षेने, रिपब्लिकन पक्षाचे नेते इतर विविध राजकीय पक्षांच्याकडे आकृष्ट होऊ लागल्याने हा पक्ष खिळखिळा होऊन या पक्षात अनेक गट व तट निर्माण झाले. त्यामुळे दलितांची शक्ती विस्कळीत झाली. दलित सुध्दा रिपब्लिकन पक्षातील नेत्यांच्या स्वार्थीपणाला कंटाळून इतर राजकीय पक्षाचा आश्रय घेऊ लागले. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात सुध्दा शाहू महाराज, राजाराम महाराज, डॉ. आंबेडकर यांचा प्रभाव असताना रिपब्लिकन पक्षात अनेक गट पडलेले आहेत. तरी सुध्दा रिपब्लिकन पक्षातील लोकांना व नेत्यांना या पक्षाबाबत अजूनही

आशा वाटते. आपल्या पक्षाला चांगले दिवस येतील व भविष्य काळात रिपब्लिकन पक्ष चांगला सामर्थवान होईल असे वाटते. परंतु सद्य:स्थिती पाहिली असता कोल्हापूर जिल्हयात इतर राजकीय पक्षांच्या प्रभावामुळे रिपब्लिकन पक्ष सामर्थ्यवान होऊन तो दलितांची एक राजकीय शक्ती बनेल असे वाटत नाही. कारण रिपब्लिकन पक्षाच्या दुसऱ्या पिढीने कोल्हापूर जिल्हयाच्या कार्यात केलेल्या विविध कार्यांच्या माध्यमातून आपल्याला या पक्षाची स्थिती व सामर्थ्य लक्षात येऊ शकेल. रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या माध्यमाने कोल्हापूर जिल्हयात खालील कार्ये पार पडली आहेत.

## कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्यावतीने मराठवाडा नामांतराचा लढा :

महाराष्ट्राच्या विधान मंडळाने १९७८ साली मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार करुन या विद्यापीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा असा ठराव मंजूर केला होता. परंतु या निर्णयामुळे महाराष्ट्रातील प्रतिगामी शक्तीने या ठरावास विरोध केला. यामुळे त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र सरकारने केली नाही. वेळोवेळी या सरकारने फक्त आश्वासने देऊन अंमलबजावणी करतो असे सांगितले होते. परंतु गेली पंधरा वर्षे हा प्रश्न तसाच पडलेला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील दलित समाजाची अस्मिता दुखावलेली होती. नामांतराचा प्रश्न हा प्रत्येक दलित व्यक्तीस जिव्हाळयाचा बनलेला होता. दलितांच्या विविध संघटना, विविध राजकीय पक्ष व रिपब्लिकन पक्षाचे सर्वच गट नामांतर झाले पाहिजे या प्रश्नावर एकत्र आले होते. विविध साहित्य संमेलनांमध्ये व मेळाव्यांमध्ये औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ झालेच पाहिजे असे ठराव करण्यात येत होते. या प्रश्नावर

विविध संघटनानी व राजकीय पक्षानी मुंबई व नागपूर येथे लाँगमार्च, मोर्चे, आयोजित करुन हा प्रश्न शासनाने सोडवीला पाहिजे असे प्रतिपादन केले होते. या आंदोलनामध्येच गौतम वाघमारे याने नामविस्तारासाठी आत्मसमर्पण केले नंतर सुहासिनी बनसोड हया तरुणीने आत्मसमर्पण केले. त्यामुळे १९९३ साली हा मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्ताराचा प्रश्न महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात निनादू लागला होता. या नामविस्तारासाठी कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटातून प्रयत्न होऊ लागला. मोर्चे,बंद, हरताळ, लाक्षणिक उपोषण, रस्ताबंदी या कार्यक्रमाद्वारे शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्यात येऊ लागले होते. कोल्हापूर जिल्हयात "रिपब्लिकन पक्ष आठवले गटामार्फत २६ डिसेंबर, १९९३ रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी भीम ज्योत व मशाल मोर्चा काढण्यात आला." त्याच प्रमाणे धरणे व लाक्षणिक उपोषणाही करण्यात आले. त्यामध्ये बाबासाहेब वड्गांवकर, भारत घोंगडे, रमेश शिर्के, आप्पासो मोरे, वसंत कांबळे, गोरख माने, सज्जनसिंह चितोडीया इत्यादी सहभागी झाले होते.[32]

मराठवाडा विद्यापीठ नामांतरासाठी केवळ घोषणा देण्याचे काम ना. रामदास आठवले थांबवून या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करावा अन्यथा सरकार निवडणूकीपर्यंत झुळवत ठेवून या प्रश्नावर मत मागायला रिकामे होईल. तेव्हा यांचा विचार करावा [33] असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे (खवई गट) जिल्हाध्यक्ष पि.एस्. कांबळे यांनी दिला होता.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव त्वरीत देण्यात यावे असा इशारा देण्यासाठी विधीमंडळाच्या पहिल्या दिवशी एक लाख कार्यकर्त्यांचा मोर्चा नेण्यात येणार आहे. त्यात सहभागी होण्याचे आवाहन दलित मुक्ती सेनेचे जोगेंद्र कवाडे यांनी इचलकरंजीत केले. [34]

या आंदोलकांचा वाढता जोर पाहून व नामांतर या प्रश्नावर दलितांच्या अस्मितेला पोहचलेला धक्का समजतो. संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कोल्हापूर जिल्हयातून या प्रश्नावर उठाव झाल्यामुळे त्यावेळचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी १४ जानेवारी, १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा केल्याचा निर्णय दिला व दलितांच्या अस्मितेचा प्रश्न सोडविला होता.

२) कोल्हापूर जिल्हयातील अन्याय अत्याचारा विरूद्ध लढा :

भारतातील अस्पृश्य समाजावर परंपरेने अन्याय व अत्याचार केला जातो. हिंदू धर्माच्या निरनिराळया ग्रंथात अस्पृश्यांना निच ठरवणारे उल्लेख आढळतात. पेशवाईच्या काळात तर या अन्याय अत्याचाराना उग्र स्वरूप आले होते. अस्पृश्यावरील अन्याय अत्याचार बंद व्हावेत. त्याना समाजात चांगल्या प्रकारे जगता यावे, यासाठी पहिला सर्वकष प्रयत्न महात्मा फुले यानी केलेला दिसतो. त्यांच्या प्रयत्नापासून स्फुर्ती घेऊन छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यांच्यावर होणारे अन्याय व अत्याचार दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला दिसतो. "अस्पृश्यता म्हणजे मानव जातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानीकारक आहे. याची जाणीव महाराजांना होती. जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेतून अनेक जाती व जातीभेद निर्माण झाले. समाजाचे स्वरूप विस्कळीत बनले. भेदातून द्वेष निर्माण झाला व देशाची एकी नष्ट झाली. याचा परिणाम केवळ धार्मिक अवनती होऊन थांबला नाही, तर भारतावर परकियांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या हे भेदाभेद बाहेरच्या शत्रूंना उपयोगी ठरले. पारतंत्र्याचे बंधन भारतीयावर कायमचे बसले. विद्या कमी होत गेल्याने व्यापार उद्योगधंदे यांची अवनती झाली. त्यामुळे मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे असे महाराजांचे स्पष्ट मत होते.[३५]

त्यामुळे त्यांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून निरनिराळे पुरोगामी कायदे करुन त्याची प्रथम अंमलबजावणी केली. अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी त्यांनी अस्पृश्यांना आपल्या दरबारात नोकऱ्या दिल्या. त्यांना आर्थिक सहाय्य दिले. अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. या शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांवरील अन्याय अत्याचार त्यांच्या काळात संपूर्णपणे बंद झाला होता. त्यांचे अस्पृश्य समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराकडे चांगले लक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेच्या द्वारे अस्पृश्यात स्वाभिमान निर्माण होत होता. याशिवाय अस्पृश्यात एकीची भावना निर्माण झाली होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायानी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षामार्फत सुध्दा अन्याय अत्याचाराविरुध्द लढे दिले जातात. जेथे अस्पृश्यांवर अन्याय अत्याचार होतो तो मोडून काढण्याचा प्रयत्न रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून केला जातो. कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या मार्फत अन्याय अत्याचाराविरोधी कार्याबाबत बोलताना अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे (गवई गट) जिल्हाध्यक्ष पी.एस. कांबळे म्हणाले की, भुदरगड तालुक्यातील ग्रामीण भागात कूर या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीच्या वादातून टी.डी. कांबळे या दलित कार्यकर्त्यास मारहाण झाली. त्यावेळी प्रचंड आंदोलन, मोर्चे व उपोषण करुन संबंधितांना निवेदने देऊन अन्याय दूर केला होता. [36]

तर याबाबत मधुकर जाधव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे जिल्हासरचिटणीस म्हणाले की, तामगाव तालुका करवीर येथे चांभार समाजाच्या माणसाने घर बांधावयास सुरवात केली होती. ते बांधकाम निम्म्यावर आल्यानंतर, तेथील ग्रामपंचायतीने ते बांधकाम अवैध आहे असे म्हणून ते बांधकाम जमीनदोस्त केले. परंतु त्याला वाचा फोडून जिल्हाधिकाऱ्यांच्या सहाय्याने ते घर पुन्हा बांधून देण्यास . ग्रामपंचायतीस भाग

पाळले होते. [३७]

तर अन्याय अत्याचार विरोधी लढयाबाबत भारतीय रिपब्लिकन पक्षाचे (प्रकाश आंबेडकर गट) जिल्हाध्यक्ष जालंदर जमादार म्हणाले की, शाहू महाराजांच्या कार्याला काळीमा फासणारी वाईट कृत्ये अजूनही ग्रामीण भागात होत आहेत. अस्पृश्यांना वाईट वागणूक, गावगुंडाकडून अन्याय अत्याचार, महिलावरील अत्याचार इत्यादी कामी, अत्याचारास आळा, पोलीस संरक्षण व न्याय मिळवून देण्याचे कार्य आम्ही करत आहोत. [३८] अशी विविध मते रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केली आहेत. दलितावरील झालेल्या अन्याय अत्याचारा विरोधी प्रामुख्याने तीन प्रकारची कार्ये असतात.

अ) अन्याय झालेल्यांचे सांत्वन करणे व त्यांचे मनोधैर्य वाढविणे.

ब) शासनाला दलितावर अन्याय करणाऱ्या विरुद्द उपाययोजना करण्याविषयी विनंती करणे व

क) अन्याय अत्याचार करणाऱ्या विरुद्द जनजागृती करणे. [३९]

अशा विविध माध्यमाने अन्याय अत्याचार होऊ नयेत म्हणून अनेक कडक कायदे केले आहेत. परंतु देशातील प्रतिगामी शक्तीमुळे व विचारामुळे दलितावर अनेक अन्याय अत्याचार होत असतात. या साठी सर्व दलितांनी एकत्र राहून त्याचा प्रतिकार करणे आवश्यक आहे. परंतु दलितांची ही शक्ती विविध गटांच्यामुळे विभाजित झाल्याने त्यांच्यावरील अन्याय अत्याचार कमी होत नाहीत. तरी सुध्दा रिपब्लिकन पक्षाचे विविध गट आपापल्या परीने या अन्याय अत्याचाराविरुद्द अल्पसा लढा देत असतात.

३) धम्म प्रसाराचे कार्य (कोल्हापूर जिल्हयातील) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळयाचा सत्याग्रह व

नाशिक येथील "काळाराम मंदिर प्रवेश" सत्याग्रह करून सनातनी हिंदू धर्माने अस्पृश्यांना सामावून घ्यावे यासाठी प्रयत्न केले. परंतु सनातनी हिंदूनी त्याना विरोध केला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी ९ डिसेंबर, १९३५ रोजी भाषण केले. "माणसाने कुठल्या जातीत जन्म घ्यावा हे माणसाच्या हातात नसते पण कुठल्या धर्मात मरावे हे त्याच्या हाती आहे. मी हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी, हिंदू धर्मात कदापी मरणार नाही. [४०]

अशी घोषणा केल्यानंतर १४ आक्टोबर, १९५६ रोजी आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धम्माचा स्वीकार केला होता. व धम्म प्रसाराचे कार्य सुरु केले होते. "राष्ट्रीय पातळीवरील रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांनी बौध्द धम्माच्या प्रसाराचे व प्रचाराचे महत्वाचे काम केले होते. ज्यावेळी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली त्याच वेळी बाबासाहेबांच्या अनुयायानी "भारतीय बौध्द महासभेचे पहिले अधिवेशन दि. ३.१०.१९५७ रोजी नागपूर येथे घेतले होते. [४१] व बौध्द धम्माचा प्रचार रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून करावयास सुरवात केली होती. याच प्रमाणे कोल्हापूर जिल्हयात देखील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या माध्यमातून धम्म प्रसाराचे कार्य केले जात आहे. पांडवदरा ( पन्हाळा ) येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या वतीने "राज्यव्यापी बौध्द धर्म संस्कृती संवर्धन परिषद" आयोजित करून दलाई लामा यांना निमंत्रित करण्यात आले होते. [४२]

याशिवाय शिरोळ, कुरुंदवाड, मुरगूड, गारगोटी या कोल्हापूर जिल्हयातील गावामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने बौध्द धम्म परिषदा आयोजित केल्या जातात. परंतु त्याचे कार्य अल्प स्वरूपात आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण भारत बौध्दमय करायचा होता. परंतु त्याचे स्वप्न रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून पूर्ण झाले नाही.

४) कोल्हापूर जिल्हयातील स्त्री कल्याण कार्ये :

महात्मा जोतीबा फुले यांनी सर्व प्रथम पुणे येथे स्त्रियांची शाळा काढून स्त्रियांना समाजात पुरुषांच्या बरोबर समान अधिकार असावेत यासाठी प्रयत्न सुरु केला. स्त्रियांची दैन्य अवस्था दूर व्हावी. स्त्रियांना समान अधिकार असावेत यासाठी हा सर्वात प्रथम प्रयत्न होता. याची प्रेरणा घेऊन छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर जिल्हयात स्त्रियांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवले होते. "बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री जीवनाच्या मागासल्यापणाची शाहू महाराजाना जाणिव होती. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत महाराजानी जाहीर केलेली होती. याशिवाय अनेक स्त्रियांच्या नेमणूका त्यानी महत्त्वाच्या पदावर केल्या होत्या. स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा, समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडून येतो. स्त्रीला कुटुंबात व समाजात आदराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते. असा महाराजांचा विश्वास होता.[४३]

त्यामुळे कोल्हापूर संस्थानात स्त्रियांची परिस्थिती सुधारत होती. शाहू महाराजांच्या प्रमाणेच डॉ. बाबासाहेब यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन उदात्त होता. २७ मार्च, १९३८ रोजी नायगावला स्वतंत्र मजूर पक्षाच्या अधिवेशनात बाबासाहेबानी मुंबई शहरातील एक लाख लोकांपैकी चार हजार लोक स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद झाले. ही लाजिरवाणी गोष्ट असल्याचे सांगितले. सभेत असलेल्या स्त्रियामध्येही पक्षाच्या सभासद असलेल्या स्त्रिया-पेक्षा सभासद नसलेल्या स्त्रियांची संख्या मोठी होती. यावर खंत व्यक्त करुन बाबासाहेबांनी विचारले, "पानसुपारीसाठी दरमहा दोन रुपये खर्च करणाऱ्या स्त्रियांना स्वतंत्र मजूर पक्षाला वर्षाकाठी आठ आने देण्यासाठी जड का वाटावे ? माझी सर्व मदार स्त्रियावरच आहे. त्या पुढे येऊन स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासद होतील तर, पुरुषांना त्याचा कित्ता गिरवणे भाग पडेल.[४४]

असे आवाहन डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना केले होते. स्वतंत्र मजूर पक्ष पुढे बरखास्त केल्यानंतर बाबासाहेबानी "शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची" स्थापना केली होती. "अखिल भारतीय दलित परिषदेसाठी २० जुलै, १९४२ रोजी भारतीय दलित महिला परिषद घेण्यात आली. परिषदेसाठी केवळ विदर्भ मराठवाडयातून नव्हे तर संपूर्ण देशातून महिला प्रतिनिधी म्हणून सुमारे २५ हजार महिला या परिषदेस हजर होत्या. [४५] यामुळे शेडयूल्ड कास्ट फेडरेशनमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठा होता. बाबासाहेबाच्या मृत्यूनंतर स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाने देखील महिलांची संघटना बांधण्याचा प्रयत्न केला होता. "२ ऑक्टोबर, १९५७ ला नागपूरला अखिल भारतीय महिला परिषद भरविण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रसिध्द महिला कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई दाणी होत्या. [४६] त्यामुळे रिपब्लिकन पक्षाची वेगळी महिला संघटना अस्तित्वात आलेली होती. परंतु नंतरच्या काळात पक्ष फुटीमुळे व पक्ष दौर्बल्यामुळे स्त्रियांच्या या संघटना कार्यक्षम राहू शकल्या नाहीत. कोल्हापूर जिल्हयात देखील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटाच्या - कडून स्त्रियांच्या संघटना बांधण्याचा प्रयत्न होत नाही. फक्त कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांची प्रत्येक तालुक्यात महिलांची संघटना आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या महिला आघाडीतर्फे सदर बाजार येथील प्रकाश विद्यामंदीर येथे नुकताच एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या मेळाव्यास प्रमुख पाहुणे बाबासाहेब वडगांवकर हजर होते. अध्यक्षस्थानी जिल्हा संघटिका सौ. इंदिरा देशमुख होत्या व मेळाव्यामार्फत स्त्री मुक्ती परिषद घेण्याचे ठरविण्यात आले होते. [४५]

एकंदरीत कोल्हापूर जिल्हयात स्त्रियांच्या कार्याबाबत व समस्याबाबत रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या माध्यमाने फारसे प्रयत्न केले जात नाहीत असे दिसते. म.फुले, शाहू महाराज, आंबेडकरांच्या विचारसरणीप्रमाणे स्त्रियांत जागृती होण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या कोल्हापूर जिल्हयातील विविध गटातर्फे फारसी कार्ये केली जात नाहीत.

४) कोल्हापूर जिल्हयातील मागासवर्गीयांचे अनुशेष भरण्याचे कार्य :

कोल्हापूर जिल्हयात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने अस्पृश्यामध्ये चांगली जागृती निर्माण झाली होती. अस्पृश्यांची दैन्य अवस्था दूर व्हावी म्हणून शाहू महाराजांनी अस्पृश्यांना निरनिराळया नोकऱ्या दिल्या होत्या. कोल्हापूर संस्थानातील नोकऱ्यात पुढारलेल्या जातींची संख्या अधिक होती. हे शाहू महाराजाना दिसून आले होते. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना निरनिराळया नोकऱ्यात प्राधान्य मिळावे म्हणून १९०२ साली ५० टक्के राखीव जागा आपल्या संस्थानात ठेवल्या होत्या. ही संपूर्ण हिंदुस्थानातील अशा प्रकारची पहिली घटना होती. त्यानंतर इ.स.१९५० साली अंमल झालेल्या राज्य घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नाने राज्य घटनेत मागासवर्गीयासाठी राखीव जागा ठेवण्यात आलेल्या आहेत. परंतु या राखीव जागा सर्वत्र अंशात: पूर्णांशाने भरल्या जात नाहीत असे आढळते. त्याला अनेक कारणे आहेत. विविध नोकऱ्यातील अनुशेष भरला जावा व अस्पृश्यांना नोकऱ्यात संधी यावी यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवर निरनिराळे मोर्चे निदर्शने आयोजित करून सरकारला निवेदने दिली जातात. रिपब्लिकन पक्षांच्या विविध मेळाव्यात व परिषदात "अनुशेष भरावा" असे ठराव केले जातात. या प्रश्नावर कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या मार्फत निदर्शने, मोर्चे, घेराव आदि कार्यक्रम करून अनुशेष भरण्याची मागणी केली जाते. याबाबत बोलताना कोल्हापूर जिल्हयातील अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) चे जिल्हाध्यक्ष पी.एस. कांबळे म्हणाले की, मी जिल्हा परिषदेचा सदस्य असताना, जिल्हा परिषदेत नोकर भरतीत मागासवर्गीयांचा अनुशेष भरून घेतला आहे. तर सहकारी साखर कारखाण्यात मागासवर्गीयांची नोकर भरती करावी यासाठी मोर्चे व आंदोलने राबवून संबंधितांना निवेदने दिली आहेत.[४८]

याबाबत बी.डी. ठिकपुर्ले (अखिल भारती रिपब्लिकन पक्ष, गवई गट) राज्यकार्यकारणी सदस्य म्हणाले की, "मी कोल्हापूर म्युनिसिपल स्कूल बोर्डाचा चेअरमन असताना बॅकलॉग भरण्याचे काम केले आहे. जिल्हा परिषद व शिवाजी विद्यापीठास हा प्रश्न सोडवण्यास लावला आहे." [४९]

तर नामदेव कांबळे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले गट) चे सदस्य म्हणाले की, १३ मार्च,१९९४ मध्ये बिद्री कारखाण्यावर मागासवर्गीयांचे आरक्षण भरावे म्हणून सुमारे अडीच ते तीन हजार लोकांचा मोर्चा काढून चेअरमन दिनकरराव जाधव यांना पक्षामार्फत निवेदन दिले होते. [५०]

कोल्हापूर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या माध्यमाने जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेवर कोल्हापूर येथे प्रचंड निदर्शने करुन धरणे व घेराव घालून मागासवर्गीयांचा अनुशेष भरावा अशी मागणी केली होती व खालील प्रकारच्या मागण्या केल्या होत्या.

(१) के.डी.सी.बँक स्थापनेपासून ३४ टक्के राखीव जागेची नोकर भरती केली नसल्याने मोठया प्रमाणात शिल्लक राहिलेल्या अनुशेष भरुन १३,७,४ + १० या प्रमाणात नोकर भरती करावी.

(२) प्रथम श्रेणी, द्वितीय व तृतीय श्रेणी व चतुर्थ या प्रत्येक श्रेणीमध्ये ३४ टक्के प्रमाण भरण्यात यावे.

(३) रोस्टर पध्दतीने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना बढती, पदोन्नती द्यावी.

(४) नवीन शाखा काढताना १०० टक्के अनुशेष भरुन काढावा.

(५) नवीन नोकर भरती करताना पैसे घेऊन नोकर भरती करु नये. पैसे घेणाऱ्या संचालकांच्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवून अशा संचालकांचे पद रद्द करण्यात यावे.

(६) मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची बदली अन्यायकारक रित्या करु नये.

(७) नोकर भरतीच्या वेळी समाजकल्याण अधिकारी वर्ग-१ उपस्थित राहून अंतिम निर्णय त्यांचा मानावा. [५१]

अशा मागण्या निवेदनात करण्यात आलेल्या होत्या. तर जिल्ह्यातील साखर कारखाने, शिक्षणसंस्था, सहकारी बँका, सहकारी संस्था आदी ठिकाणचा मागासवर्गीयांचा अनुशेष भरावा या मागणीसाठी कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्यात विविध नेत्यानी नेतृत्व केले होते. [५२]

असे विविध प्रयत्न करुन कोल्हापूर जिल्ह्यातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याचे कार्य रिपब्लिकन पक्षाच्या गटाकडून केले जाते. परंतु जिल्हातील संपूर्ण दलित व मागासवर्गीय रिपब्लिकन पक्षात एकी नसल्याने व रिपब्लिकन पक्षात अनेक गट असल्यामुळे कार्य तुरळक प्रमाणात चाललेले दिसते.

५) कोल्हापूर जिल्ह्यातील भूमिहिनांचा व जमिनी परत मिळवण्याचा लढा :

भारतामध्ये शेतजमिनीचे व पडिक जमिनीचे वाटप असमान पध्दतीने झाले आहे. त्यातच दलितांच्या जमिनी अज्ञानामुळे, दारिद्र्यामुळे व पिळवणूकीमुळे सवर्ण समाजाकडे हस्तांतरित होतात. दलितांचा बहुसंख्य जमिनी या दारिद्र्यामुळे व अज्ञानामुळे सावकारांच्याकडे गहाण पडलेल्या आहेत. त्या जमिनी सोडवून घेण्यासाठी व दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून ज्या पडिक जमिनी आहेत त्या दलितांना कसायला मिळाल्या पाहिजेत तरच दलितांना आर्थिक प्रगती करता येईल. जमिनीच्या असमान वाटणीमुळे दलितांची आर्थिक परिस्थिती हालाखीची बनलेली आहे. ही परिस्थिती

बदलावयाची असेल तर दलितांना त्यांच्या जमिनी (ज्या जबरदस्तीने बळकावल्या आहेत) परत मिळाल्या पाहिजेत व ज्या पडिक सरकारी जमिनी आहेत त्या दलितांना कसायला मिळाल्या पाहिजेत. या संदर्भात "१९५१ साली लोकसभेत घटना दुरुस्तीवर भाषण करत असताना डॉ. आंबेडकरानी मंत्रीमंडळात असताना राज्यकर्त्यांनाच सवाल केला होता की, तुमचे धोरण असेल त्याची जमिन आहे पण माझा सवाल असा आहे की, नसेल त्याचे काय ? [53] या प्रश्नाचे उत्तर सरकारला देता आले नव्हते. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाने अखिल भारतीय पातळीवर एन्. शिवराज, दादासाहेब गायकवाड, राजाभाऊ खोब्रागडे, बी.सी. कांबळे, खासदार दत्ता कट्टी, खासदार एस्.के.डिगे, आमदार दा.म.शिर्के यांच्या माध्यमाने संपूर्ण देशभर विशेषत: महाराष्ट्रात १९५९ ते १९६२ या कालखंडात भूमिहीनाना सरकारी व पडिक जमिनी मिळाव्यात व दलितांच्या बळकावलेल्या जमिनी परत मिळाव्यात म्हणून अभूतपूर्व लढा पक्षाने दिला होता.

त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्हयात १९८६-८७ साली केलेल्या पाहणीनुसार कोल्हापूर जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ७७६२६१ हेक्टर इतके होते. त्यामध्ये लागवडी लायक पण वापरात नसलेली पडिक जमीन ४६२६८ हेक्टर इतकी होती. [54] या प्रकारची जमीन दलितांना मिळावी व दलितांच्या अज्ञानतेमुळे बळकावलेल्या जमिनी परत मिळवण्यासाठी कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाने व त्यांच्या विविध गटाने खालील प्रकारचे प्रयत्न केलेले दिसतात. भूमिहिनांच्या लढयाबाबत अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) राज्यकार्यकारणी सदस्य बी.डी. ठिकपूर्ले म्हणाले की, १९७४ ते १९७६ या दोन वर्षात कोल्हापूर जिल्हयातील प्रचंड ऐक्य संघटनेच्या जोरावर "भूमी मुक्ती" आंदोलन छेडले त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधीनी त्यांची तीव्रता लक्षात घेऊन debt Act कायदा केला. सावकारीच्याकडून ४०० च्या वर अस्पृश्यांच्या जमिनी मुक्त केल्या. आमच्या पक्षामार्फत हे कार्य केले आहे. [55]

तर याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे राज्य-कार्यकारणी सदस्य बाबासाहेब वड्डावकर म्हणाले की, या प्रश्नावर जिल्ह्यात गेल्या पंचवीस वर्षांत ७९६० एकर जमीन भूमिहीन दलितांना मिळवून देऊन राज्यात एकट्या मोठ्या प्रमाणात जीवदान देण्याचा प्रयत्न केला आहे.[५६]

तर अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट) जिल्हाध्यक्ष आलंदर जमादार म्हणाले की, खासदार प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आमच्या पक्षाचे कोल्हापूर जिल्ह्यात अनेक दलितांना आम्ही जमिनी परत मिळवून दिल्या आहेत. आणि भुमिहिन हक्क संरक्षण समिती-च्या वतीने आमच्या पक्षाने जिल्ह्यात मेळावे, परिषदा आयोजित करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.[५७]

भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात यासाठी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) जिल्हाध्यक्ष पी.एस्. कांबळे म्हणाले की, "राजर्षि शाहू जन्म शताब्दिच्या काळात सन १९७४ साली दलितांच्या कब्जेगहान, हस्तांतरीत जमिनी दलितांना परत मिळाव्यात यासाठी आम्ही "भुमिमुक्ती" आंदोलनास सुरवात केली त्याची सुरवात २१ ऑगस्ट, १९७४ रोजी कूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे झाली. त्यानंतर या चळवळीने जिल्ह्यात जागृती करून मोर्चा, मेळावे, उपोषन, जेलभरो यासारखे आंदोलन करून जवळ-जवळ ५०० च्या वर दलितांच्या जमिनी परत मिळवल्या.[५८]

अशी विविध प्रकारच्या माध्यमानी दलितांच्या कब्जात गेलेल्या जमिनी, व जिल्ह्यातील पडिक सरकारी जमिनी दलितांना मिळाव्यात म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या गटानी प्रयत्न केलेले दिसतात. परंतु हा प्रश्न अतिशय व्यापक आहे आणि तो पूर्णपणे सोडविण्यासाठी रिपब्लिकन

पक्षा अपुरा पडत आहे. जिल्ह्यातील सर्व दलित, मागास, इतरमागास, भटके, विमुक्त इत्यादी सर्व लोकांनी एकत्र आल्यास हा प्रश्न चांगल्या रीतीने सुटू शकेल. परंतु हे रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या कडून घडत नाही. त्यामुळे दलितांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती न सुधारल्याने व रिपब्लिकन पक्षाच्या अनास्थेमुळे दलित लोक इतर पक्षाकडे जात आहेत.

६) कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सहकारी चळवळीतील कार्य :

छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणेने १८९५ मध्ये रेल्वे स्टेशन जवळ शाहुपुरी या व्यापार पेठेची स्थापना झाली. १९०६ मध्ये शाहू महाराजांनी "शाहू छत्रपती" स्पिनिंग व विव्हिंग मिलचा पाया घातला. १९०७ मध्ये सहकारी तत्वावर एका कापड गिरणीची उभारणी केली. [५९]

या पध्दतीने शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली होती. त्यामुळे सुरवातीपासूनच कोल्हापूर संस्थान सहकारी चळवळीत अग्रेसर होते. त्यानंतरच्या काळात १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात ६,३८४ सहकारी संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या २७७४ होती. सन १९९१-९२ मध्ये जिल्ह्यातील सहकारी संस्थांची संख्या ६०१५ होती. म्हणजेच १९९२-९३ या वर्षात संस्थेच्या संख्येत वाढ झालेली आहे. जिल्ह्यातील एकूण ६३८४ सहकारी संस्था पैकी सहकारी कृषि पतसंस्थेची टक्केवारी १७.४३ होती. तर बिगर शेती पतसंस्थेची टक्केवारी २२.५९ होती. याच वर्षात एकूण सहकारी संस्थापैकी पणन संस्था, उत्पादन संस्था व सामाजिक संस्थेची टक्केवारी अनुक्रमे ०.४७, ४२, ०६, १७.४५ या प्रमाणे होती. १९९२-९३ मध्ये जिल्ह्यामध्ये उत्पादन संस्थांची संख्या २६८५ होती. यामध्ये दुध संस्थेची टक्केवारी सर्वात जास्त ५९.८९ होती. जिल्ह्यामधील सिंचन संस्थांची व औद्योगिक संस्थांची

टक्केवारी अनुक्रमे १८.८८ व ८.३० होती. १९९२-९३ मध्ये जिल्हयामधील सामाजिक संस्थांची संख्या १११४ होती. यामध्ये गृहनिर्माण व ग्राहक संस्थांची टक्केवारी अनुक्रमे ४९.६४ व १९.८४ होती. कामगार के गट संस्था ६.३७ टक्के होत्या. [६०]

वरील टक्केवारी पाहिली असता, कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या माध्यमातून सहकारी संस्था उभ्या करण्याचा प्रयत्न फारच थोडा झालेला दिसतो. याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) बाबासाहेब वड्डाककर म्हणाले की, जिल्हयात आम्ही पतसंस्था, दुग्ध व्यवसाय संस्था, शिक्षण संस्था, कुक्कुटपालन संस्था यांचे जाळे आम्ही कोल्हापूर जिल्हयात विणले आहे. व त्याचा लाभ अनेक तरुणांना झाला आहे. [६१]

तर सहकारी संस्थेबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे जिल्हा संघटक एस्.एस्. कांबळे म्हणाले की, आम्ही निरनिराळया सहकारी संस्था जिल्हयात स्थापन करत आहोत. व त्याचा लाभ अनेक बेरोजगारांना मिळत आहे. [६२]

वास्तविक कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या माध्यमाने फारसे यश सहकारी चळवळीत या पक्षाला मिळाले नाही असे दिसते. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने कोल्हापूर जिल्हयातील दलितांचा आर्थिक विकास मोठया प्रमाणावर होत नाही असे दिसून येते.

७) कोल्हापूर जिल्ह्यातील बेघरांना घरे मिळवून देणे :

कोल्हापूर जिल्ह्यात दलित समाज हा संख्येने फार मोठा असला तरी, त्यांना रहाण्यासाठी पक्क्या स्वरूपात चांगल्या प्रकारची घरे उपलब्ध नाहीत. कोल्हापूर जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण भारतात अनेक लोक बेघर आहेत. या बेघरांचे पुनर्वसन होऊन त्यांना चांगल्या प्रकारची घरे रहाण्यासाठी मिळाली पाहिजेत यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी अनेक दलित, भटके, विमुक्त यांना आपल्या संस्थानातील मोकळ्या जागा देऊन पुनर्वसन करण्याचे कार्य केले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील दलित समाजाच्या व रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी पक्षाच्या सुरवातीच्या काळात "रतन कांबळे यांनी अनेक गावात बॅकवर्ड हौसिंग सोसायटया स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता." [६३] याच बरोबर मा.ई. कुरणे यांनी देखील दलितांच्या हौसिंग सोसायटया स्थापन करून दलितांना घरे मिळवून दिली होती. परंतु आजच्या काळात रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने फारच तुरळक प्रमाणात कार्य चालले आहे. या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे राज्यकार्यकारीणी सदस्य बाबासाहेब वडांकर म्हणाले की, पूर्वी समाज कल्याण खात्याची पी.डब्ल्यू.आर. ही गृहनिर्माण संस्थेची योजना फक्त ८,०००/- रुपयांची होती. त्यामध्ये आम्ही आंदोलन करून ती आम्ही ५८,०००/- रुपयांची केली आहे. त्यात सहा हजार रुपये अनुदान स्वरूपात मिळते. [६४]

तर याच पक्षाचे सदस्य नामदेव कांबळे म्हणाले की, रिपब्लिकन पक्षातर्फे १९९४ साली आंदोलने करून १८० लोकांना प्रत्येकी १ गुंठा याप्रमाणे फणसवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे जागा मिळवून दिली आहे. आणि लवकरच येथे आम्ही बांधकाम सुरु करत आहोत. [६५]

दलितांचा हा प्रश्न व्यापक स्वरूपाचा आहे. परंतु रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या कडून फारसे प्रयत्न केले जात नाहीत. त्यामुळे दलितांचे प्रश्न व समस्या सोडविण्याचे माध्यम म्हणून रिपब्लिकन पक्षाकडे पाहिले जात नाही असे दिसून येते.

८) कोल्हापूर जिल्हयातील देवदासी निर्मुलनाची कळकळ :

हिंदू समाजात अनेक अनिष्ठ प्रथा व परंपरा निर्माण झालेल्या आहेत. या प्रथा बंद होण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रबोधनाच्या मार्गाने या प्रथा परंपरा बंद करण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा प्रथेच्या व परंपरेच्या विरोधी लढा देत होते. "आंबेडकरी कार्यकर्त्यांनी देवदासी, मुरळया, जोगतीनी आदि स्त्रियांची एक परिषद १३ जून, १९३६ रोजी परळ येथे दामोदर हॉलमध्ये आयोजित केली होती. या परिषदेत आंबेडकरानी पुढील भाषण केले. "तुमच्या मुळे आमच्या समाजाला लांछन आहे. स्त्री जात समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्री चरित्राला अधिक मान देतो. म्हणून तुम्ही या मलीन आयुष्याचा त्याग करा. आपला आणि समाजाचा दर्जा व नावलौकिक वाढवा मी तुम्हाला हे निंद्य जीवन सोडण्यास सांगतो याचा अर्थ उपजिविकेची साधने मी उपलब्ध करून देईल असे नाही. परंतु संपत्तीपेक्षा चारित्र्य महत्त्वाचे आहे. [६६] असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांच्याच या विचाराचा वारसा घेऊन रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर व कोल्हापूर जिल्हयात फारसे कार्य झाले नाही. त्यामुळे ही अनिष्ठ प्रथा दलित समाजात चालूच राहिली आहे आणि या द्वारे दलित स्त्रियांची पिळवणूक फार मोठया प्रमाणावर होत आहे. शासनाने देवदासींच्या पुनर्वसनासाठी निरनिराळया योजना आखल्या आहेत. परंतु रिपब्लिकन पक्षाच्या वतीने या योजनांचा लाभ दलित स्त्रियांना मिळवून दिला जात नाही. याबाबत फक्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे एक सदस्य नामदेव कांबळे म्हणाले की, आम्ही

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियामार्फत देवदासींची अनिष्ठ प्रथा नष्ट करुन त्यांना स्वाभिमानाने जगता यावे म्हणून देवदासींचा मेळावा घेऊन त्यांना "महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ यांच्याकडून एक लाख रुपये कर्ज स्वरुपात मिळवून दिले आहे. सुमारे ८०० देवदासींना याचा लाभ मिळालेला आहे. १९८४ ते १९८५ अखेर ३३ देवदासी मुलींचे विवाह घडवून आणून त्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये अनुदान मिळवून दिले आहे." [६७]

परंतु एकंदरीत प्रश्नाचे स्वरुप पहाता कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या वतीने हा व्यापक प्रश्न हाताळला गेला नाही व त्यांचे या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले दिसते.

१) <u>कोल्हापूर जिल्हयातील पुतळा विटंबना विरोधी निदर्शने :</u>

कोल्हापूर जिल्हयात निरनिराळ्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभारलेले आहेत. परंतु काही जातीयवादी व प्रतिगामी शक्तींच्या द्वारे या पुतळ्याची विटंबना करण्यात येते. या पुतळयांच्या विटंबना प्रकरणात हुपरी, सामगाव, पैठण या ठिकाणी पुतळ्याच्या झालेल्या विटंबनेचा निषेध करण्यासाठी २५ फेब्रुवारी, १९८९ रोजी लॉंगमार्च आयोजित करुन जिल्हया-भर नाकेबंदी व जमाव बंदी केली होती. या लॉंगमार्च लढ्यासाठी शंकरराव आवळे, बाबासाहेब वडगावकर, दत्ता जाधव, मंगल माळगे, बी. डी. ठिकपुर्ले, ॲड. सुदर्शनी इत्यादींनी सहकार्य केले होते. [६८]

या प्रकरणात रिपब्लिकन पक्षाचे (सर्व गटाने) एकत्र येऊन या कृत्याचा निषेध केला होता.

वरील प्रकारची कार्ये थोडीफार कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन

पक्षाच्या विविध गटातर्फे केलेली दिसतात. वरील कार्याचे एकंदरीत स्वरूप व व्यापकता पाहिली असता कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्याकडून फार मोठी कार्ये झालेली दिसत नाहीत. याला खालील प्रकारची कारणे कारणीभूत असलेली दिसतात.

१) रिपब्लिकन पक्षातील गट :

राष्ट्रीय पातळीपासून ते गाव पातळीपर्यंत रिपब्लिकन पक्षात अनेक गट निर्माण झालेले दिसतात. परिणामी सर्व दलित व मागासले लोक निरनिराळ्या गटाकडे आकर्षित झाले आहेत. त्यामुळे या प्रश्नाचा प्रभाव कोणत्याही कार्यावर दिसत नाही.

२) इतर राजकीय पक्षांचा प्रभाव :

राष्ट्रीय पातळीपासून ते गाव पातळीपर्यंत काँग्रेस पक्ष व इतर राजकीय पक्ष फारच प्रभावीपणे कार्यरत आहेत आणि काही दलित नेत्यांना आपण त्या पक्षातून निवडून येऊ अशी खात्री असल्याने ते इतर राजकीय पक्षात सामील होतात. उदा. कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव या विधानसभेच्या राखीव मतदार संघात नेहमी काँग्रेसचाच उमेदवारविजयी होत असताना दिसतो. त्यामुळे जिल्ह्यातील बहुसंख्य दलित समाजहा काँग्रेस व इतर राजकीय पक्षाकडे झुकलेला दिसतो. याचापरिणाम म्हणजे रिपब्लिकन पक्षाच्या कोणताही गट आज प्रभावी नाही.

३) फक्त बौध्दांचाच प्रश्न :

रिपब्लिकन पक्ष हा डॉ. आंबेडकरांच्या व्यापक विचारसरणीतून साकार झालेला आहे. परंतु या पक्षाकडे संकुचित व जातीय दृष्टिकोनातून पाहिले जाते.

डॉ. आंबेडकर हे महार जातीचे असल्याने हा प्रश्न केवळ महाराजांचा पक्ष आहे असे समजून दलित समाजातील इतर जाती फार मोठया प्रमाणा-वर या पक्षात येत नाहीत.

४) <u>नेत्यांची स्वार्थी वृत्ती :</u>

रिपब्लिकन पक्षाचे नेते हे दलित समाजात चांगल्या प्रकारे मिसळून कार्य करत नाहीत. त्यांच्या समस्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करत नाहीत. त्यामुळे दलित समाज एका बाजूला तर रिपब्लिकन पक्षाचे नेते एका बाजूला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

५) <u>या पक्षाच्या संघटना नाहीत :</u>

पक्ष हा संघटनेच्या कार्यावर ठरत असतो. ज्या पक्षाची संघटना कार्यक्षम असते, तो पक्ष सामर्थवान होतो. परंतु व्यापक स्वरूपात कोल्हापूर जिल्ह्यात या पक्षाने संघटना बांधलेल्या नाहीत. उदा. विद्यार्थी संघटना कामगार संघटना, स्त्री संघटना, त्यामुळे हा पक्ष जनमानसात लोकप्रिय नाही.

६) <u>प्रसार माध्यमाचा अभाव :</u>

राजकीय पक्षाचे कार्य हे प्रसार माध्यमाद्वारे चालते. पक्ष वाढीसाठी पक्षाची स्वतः:ची प्रसार माध्यमे आवश्यक असतात. वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिक नियतकालिक इत्यादी द्वारे पक्षाचे महत्व व कार्य लोकांना पटवून देता येते. परंतु या पक्षाची कायमस्वरूपी अशी काही यंत्रणा नसल्याने हा प्रश्न मर्यादित प्रमाणात यशस्वी झालेला दिसतो.

७) योग्य प्रबोधनाचा अभाव :

पक्ष संघटना वाढविण्यासाठी समाजाचे योग्य प्रबोधन होणे आवश्यक असते. सभा, संमेलने, मेळावे, परिषदा भरवून समाजात आपल्या पक्षाचे ध्येय धोरण व माहिती समजावून सांगावयाची असते. परंतु या कार्यात रिपब्लिकन पक्ष अपुरा पडत आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाची वाढ होत नाही तर ती दिवसेंदिवस त्यात विस्कळीतपणा येत आहे.

वरील कारणांच्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाद्वारे दलित समाजाचे संघटन राजकीय दृष्टया होत नसल्यामुळे हा प्रश्न कोल्हापूर जिल्ह्यात रूजू शकत नाही. वास्तविक या जिल्ह्याला छत्रपती शाहू महाराजांची व त्यांच्या विचारांची देणगी मिळालेली असताना कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाचे कार्य निराशाजनक पध्दतीने चालले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न कोल्हापूर जिल्ह्यात साकार झाले नाही.

परंतु डॉ. आंबेडकरांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाविषयी सर्व प्रथम जो गैरसमज निर्माण झालेला आहे तो दूर केला पाहिजे. रिपब्लिकन पक्ष म्हणजे केवळ महारांचा (बौध्दांचा) पक्ष हा गैरसमज दूर करण्यासाठी रिपब्लिकन पक्षात इतर मागासवर्गीयांना समाविष्ठ करून घेतले पाहिजे. कारण कोल्हापूर जिल्ह्यात अनुसुचित जाती व जमातीचे प्रमाण १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात अनुसुचित जातीची एकूण लोकसंख्या ३८१०२९ इतकी असून ती एकूण लोक संख्येच्या १२.७५ टक्के आहे. ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण १३.७३ टक्के असून नागरी लोकसंख्येचे प्रमाण १०.९९ टक्के आहे. जिल्ह्यात अनुसुचित जमातीची लोकसंख्या १४,७८९ इतकी असून एकूण लोकसंख्येच्या ०.४९ टक्के आहे. ग्रामीण व नागरी लोकसंख्येची टक्केवारी

अनुक्रमे ०.५% व ०.२५ आहे. [६९] यामुळे सर्व अनुसूचित जाती, जमाती, भटके विमुक्त व एन्.टी. ओबीसी, मुस्लीम हे मागासलेले वर्ग एकत्र येऊन कार्य करु लागले तर रिपब्लिकन पक्षाचे सामर्थ कोल्हापूर जिल्हयात वाढू शकेल. या संदर्भात सर्व लोकांना रिपब्लिकन पक्षात सामावून घेण्यासाठी काय करता येईल या प्रश्नावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) जिल्हा सरचिटणीस म्हणाले की, इतर मागासवर्गीयांना रिपब्लिकन पक्षात समाविष्ट करुन घेण्यासाठी प्रथम त्यांचे सामाजिक व राजकीय अस्तित्व काय आहे हे त्याना पटवून देणे आवश्यक आहे. कारण आर्थिक, राजकीय व सामाजिक दृष्टया तेही आमच्या सारखेच आहेत. याची त्यांना जाग आणली पाहिजे. तसेच त्या ठिकाणी डॉ. आंबेडकरांनी आपल्या सर्वांसाठी कोणती कार्ये केली याची माहिती त्यांना दिली पाहिजे. या सर्व इतर मागासवर्गीयांचे वैचारिक प्रबोधन झाले पाहिजे. आणि त्यांच्यामध्ये आपल्या पक्षाबद्दल विश्वास निर्माण केला पाहिजे. तरच रिपब्लिकन पक्षात इतर मागासवर्गीय समाविष्ट होतील व पक्ष वाढीला लागू शकेल. [६९]

तर रिपब्लिकन पक्ष कांबळे गटाचे सदस्य धर्मरक्षी म्हणाले की, डॉ. बाबासाहेबाना अभिप्रेत रिपब्लिकन पक्ष हा सर्व भारतीयासाठी होता. तशी पक्षाची घटनासुध्दा आधी लोकशाही मुल्यावर आधारित आहे. बाबासाहेबांच्या काळात त्यांनी चालविलेल्या संघटनामध्ये इतर समाजच नव्हे तर ब्राम्हण मंडळीसुध्दा सहभागी होती. मात्र बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या तोलामोलाचा नेता राहिला नाही. इतर सर्वजण नव्हे तर काही अपवाद वगळता इतर मागासवर्गीय (रयत) सहकारी कार्यकर्ते या पक्षातील नेतृत्वाला आकर्षित करता आले नाहीत. ही वास्तवता आहे. इतर मागासवर्गीय नव्हे तर मुस्लिम व ख्रिश्चन अल्पसंख्यांक सुध्दा या पक्षाला मिळायला हवे होते. परंतु नेतृत्व या प्रयत्नात अयशस्वी झाले. भारतातील

इतर मागास व अल्पसंख्य हे सर्व एकाच कुटुंबातील सदस्य असून या मूळ निवासीना कसे बाजूला टाकले आहे व याला हिंदू-भेदनिती कशी कारणीभूत ठरली आहे याची जाणीव व जागृती करणे आजची नितीत गरज आहे. तरच रिपब्लिकन पक्षात इतर मागासवर्गीय समाविष्ट होउ शकतील. [७०]

तर कोल्हापूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते आर.एस. कांबळे म्हणाले की, खरे तर रिपब्लिकन पक्ष हा शोषीतांचा, मजूरांचा पद-दलितांचा व मागासवर्गीयांचा आहे. पण यामध्ये इतर कार्यकर्त्यांना येण्यास मज्जाव नाही. रिपब्लिकन पक्षाचे हेच दुःख आहे की, इतर मागासवर्गीय या पक्षाकडे केवळ महारांचा पक्ष म्हणून बघतात. लोकांचा हा दृष्टिकोन चुकीचा आहे. बाबासाहेबांना ज्या हेतूने हा पक्ष स्थापन करावयाचा होता तो हेतु कोणी लक्षात घेतलाच नाही. हा पक्ष सर्व बहुजन लोकासाठी आहे. आम्ही रिपब्लिकन पक्षाची ध्येय व उद्दिष्टे लोकांच्यापर्यंत पोहचवू शकलो नाही त्यामुळे इतर मागसवर्गीय या पक्षाकडे दूषित नजरेने पहातात. त्यामुळे इतर मागासवर्गीयांना रिपब्लिकन पक्षात सामील करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे ध्येय-धोरणे, कार्यक्रम त्यांना समजावून सांगितली तर ते निश्चितपणे या पक्षात येतील. या बाबतीत आम्हा कार्यकर्त्यांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. आम्हीही इतर मागासवर्गीयांच्याकडे आपला माणूस म्हणून पाहिले पाहिजे. म्हणजे त्यांना खात्री पटेल की, रिपब्लिकन पक्ष आपलाच आहे. [७१]

अशी विविध मते रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मांडली जातात. या सर्वांचे समान सूत्र असे आहे की, डॉ. बाबासाहेबांचे विचार सर्व इतर मागास वर्गीयात चांगल्या प्रकारे समजावून देउन त्यांचे प्रबोधन केले पाहिजे. तरच इतर मागासवर्गीय रिपब्लिकन पक्षात सामील होतील व पर्यायाने पक्ष मजबूत होउन पक्षाचे सामर्थ्य वाढीस लागेल. ह्या दृष्टिकोनातून फकिर समाजात जागृती

व्हावी म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्यावतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढला होता. (कल्ती हातोडा) तर याच पक्षाच्या वतीने बेलदार, डवरी, गोसावी, नाथपंथी गोसावी, बेलदार मातीवड्ड इत्यादी लोकांचा रिपब्लिकन पक्षात सामावून घेण्यासाठी या पक्षाने अभियान चालू केले होते. ७२

परंतु हे प्रयत्न फारच अल्प प्रमाणात होत चालले आहेत. त्यामुळे इतर राजकीय पक्ष या इतर मागासवर्गीयांना केवळ निवडणूकीत आश्वासने देऊन त्यांची मते पदरात पाडून घेत असलेली दिसतात. ख-या अर्थाने रिपब्लिकन पक्षाचे सामर्थ्य वाढवायचे असेल तर, पक्षाची संघटना व केडर निर्मिती केली पाहिजे. निरनिराळ्या आघाड्यावर ज्या पक्षाने कार्य केले पाहिजे या पक्षानी मजूर, कामगार, स्त्री, आदिवासी, नोकर, वकिल, डॉक्टर, विद्यार्थी इत्यादी संघटना निर्माण करुन रिपब्लिकन पक्षाचे कार्य तळागाळातील लोकांच्या पर्यंत पोहचवले पाहिजे. तरच या पक्षात इतर मागासवर्गीय लोक समाविष्ठ होतील आणि पर्यायाने कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाला चांगला दर्जा प्राप्त होऊ शकेल. आणि यासाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, कोल्हापूर जिल्ह्यात ज्या रिपब्लिकन पक्षाच्या व इतर दलित संघटनाचे गट-तट आहेत ते विसरुन सर्व लोक एकत्र यायला पाहिजेत. म्हणजेच या सर्व रिपब्लिकन गटांचे ऐक्य झाले पाहिजे. तरच रिपब्लिकन पक्ष हा सामर्थ्यवान व इतर राजकीय पक्षाना पर्याय म्हणून उभा राहू शकेल. रिपब्लिकन पक्षात राष्ट्रीय पातळीपासून पक्ष फुटीला सुरवात झालेली आहे. व दिवसेंदिवस या पक्षाचे ऐक्य न होता या पक्षात अनेक गट व तट निर्माण होत चाललेले आहेत. जर या पक्षात ऐक्य झाले तर हा पक्ष चांगला सामर्थ्यवान होऊन सर्व आघाड्यावर चांगल्या प्रकारे कार्य करु शकेल. परंतु रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर अवघ्या २ वर्षाच्या कालखंडात या पक्षात फुटीला सुरवात झालेली दिसते. रिपब्लिकन पक्षाची स्थापना डॉ. आंबेडकरांच्या अनुयायानी एकत्र येऊन दि. ३.१०.१९५७

रोजी विधीवत याची स्थापना केली. रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर या पक्षाचे कार्य चांगल्या जोमाने चाललेले होते. राष्ट्रीय पातळीवर हा पक्ष सामर्थ्यवान बनलेला होता. राष्ट्रीय पातळी बरोबरच कोल्हापूर जिल्हयात देखील खासदार एस्.के. डिगे व आमदार दा.म. शिर्के यांच्या कुशल नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्ष चांगल्या पध्दतीची कामे करत होता. आमदार शिर्के यांनी कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने फार मोठी कामगिरी बजावलेली दिसते. दलितांचे अनेक प्रश्न, समस्या, अडचणी जिल्हाधिका-यांच्या मतदीने सोडविण्याचे ते कार्य करत होते. लोकसभेत सुध्दा एस्.के. डिगे हे कोल्हापूर जिल्हयाचे प्रतिनिधित्व चांगल्या पध्दतीने करत होते. एकूणच संपूर्ण देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने साकार करायचे हा सर्व दलितामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला होता. म्हणूनच "रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासून ते विघटनाच्या अवस्थेपर्यंतच्या काळाला रिपब्लिकन पक्षाचा "सुवर्णयुगाचा काळ" असे म्हणता येईल. बाबासाहेबांच्या निर्वाणामुळे जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीमध्ये रिपब्लिकन पक्षाने जे नतृत्व दिले व जे कार्य केले आणि जे यश प्राप्त केले ते अत्यंत महत्त्वाचे होते. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपूर्वी दलितांनी ज्या निवडणूका लढवल्या त्यामध्ये फारसे यश आले नव्हते. पक्षाच्या विघटनानंतर ज्या निवडणूका लढवल्या गेल्या त्यामध्येही १९५७ च्या तुलनेस निवडणूकीत या पक्षाला यश मिळाले नाही. त्यामुळे ३ आक्टोबर, १९५७ ते ३ आक्टोबर, १९५९ या काळात रिपब्लिकन पक्षाने जे कार्य केले तसे कार्य नंतरच्या काळात देखील झाले नाही. म्हणून सुरवातीच्या पहिल्या दोन वर्षाचा कालखंड म्हणजे रिपब्लिकन पक्षाचा सुवर्णकाळ होता. [७३] परंतु अवघ्या दोनच वर्षात या पक्षामध्ये फुट पडली व बी.सी. कांबळे, बाबासाहेब रूपवते, हरदास आवळे यांच्या नेतृत्वाखाली दुरूस्त रिपब्लिकन पक्ष निर्माण झाला आणि बाबासाहेब गायकवाड, एन्. शिवराज, आर.डी. भंडारे यांच्या नेतृत्वाखाली जुना नादुरूस्त रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला आणि या पक्षात दोन गट पडले. या दोन गटात एकी

व्हावी यासाठी रिपब्लिकन पक्षाचे मद्रास मधील जेष्ठ नेते एन्. शिवराज यांनी खूप प्रयत्न केले. परंतु रिपब्लिकन पक्षामध्ये नेतृत्वाच्या हव्यासामुळे या पक्षात एकी होऊ शकली नाही. या पक्षास राष्ट्रीय पातळीवर ऐक्य व्हावे यासाठी स्वत: डॉ. आंबेडकरांच्या पुत्राने "१४ नोव्हेंबर, १९५९ रोजी दामोदर हॉल परळ येथे बैठक बोलावली होती. त्यात दोन्ही गटांच्या पुढाऱ्याना समाविष्ट करुन तोडगा काढायचे ठरवले होते. परंतु दुर्दैवाने यशवंतराव आंबेडकर यांनी ऐक्य होण्याच्या अगोदरच ही मिटींग बरखास्त झाल्याचे जाहीर केले होते. म्हणून हा ऐक्याचा दुसरा प्रयत्नही फसला असे अनेक ऐक्याचे प्रयत्न राष्ट्रीय पातळीवर होत आला. परंतु या पक्षामध्ये अजूनही ऐक्य झाले नाही आणि ऐक्य झाले असले तरी ते फार काळ टिकले नाही. या राष्ट्रीय पातळीवरील फूटीचा परिणाम कोल्हापूर जिल्हयात देखील झालेला दिसतो. कोल्हापूर जिल्हयातील जुने कार्यकर्ते मा. ह. कुरणे याबाबत म्हणतात की, "बाबासाहेबांच्या पश्चात आम्ही कर्मवीर भाऊराव गायकवाड यांचे नेतृत्व स्विकारुन काम करायला लागलो. रतन कांबळे हे आमचे अध्यक्ष होते आणि मी चिटणीस होतो. दरम्यान फुटिच्या बातम्या येउ लागल्या". दुरुस्त रिपब्लिकन पक्ष निघाल्याचे ऐकू येऊ लागले. दरम्यानच्या काळात पक्षाची एक बैठक कोल्हापूरला भरली मी त्या सभेला उपस्थित होतो. त्या सभेस रावबहाददूर एन्. शिवराज आलेले होते. रीतसर पक्षाची स्थापना झाली त्यात कडाडून विरोध बी.सी. कांबळे यांनी केला. तरीही आम्ही बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली काम करीतच राहिलो. दरम्यानच्या काळात निवडणूकीच्या संदर्भात दादासाहेब गायकवाड यांनी घेतलेली समझोत्याची भूमिका काही मनापासून पटत नव्हती. म्हणून त्यानंतर आम्ही बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या समवेत काम करायला सुरवात केली. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही बराच काळ म्हणजे काल-परवा पर्यंत काम केले. खोब्रागडे साहेबांच्या निर्वाणामुळे एक पोकळी निर्माण झाली. त्यामुळे त्याच तोलामोलाचा नेता

कोण म्हणून गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करावयास प्रारंभ केला. इतरांच सोडा परंतु कोल्हापूर जिल्हयात खोब्रागडे गट आणि गवई गट यांचा आम्ही यशस्वी समझोता केला." ७४

आणि ह्या दोन्ही गटांच्या यशस्वी एकीनंतर कोल्हापूर जिल्हयात गवई गटांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाचे कार्य चांगल्या पध्दतीने चालले होते. बी.सी. कांबळे गट सुध्दा या काळात कोल्हापूर जिल्हयात अस्तित्वात होता. परंतु हा गट फारसा कार्यक्षम नव्हता. १९९० सालच्या झालेल्या ऐक्यानंतर कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट निर्माण झाले. उदा. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट), जुना रिपब्लिकन पक्ष (बी.सी. कांबळे गट), दलित मुक्ती आघाडी (जोगेंद्र कवाडे गट), जुना अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) असे कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाचे अनेक लहान-मोठे गट आढळून येतात. परंतु या अनेक गटात आज ऐक्य होऊ शकत नाही. या सर्व गटाचे कोल्हापूर जिल्हयात ऐक्य झाले तर रिपब्लिकन पक्ष हा कोल्हापूर जिल्हयातील दलितांचा चांगला पक्ष व संघटना बनू शकेल. या संदर्भात या रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या नेत्यांची मते पुढील प्रमाणे त्यांनी व्यक्त केलेली दिसतात.

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) जिल्हाध्यक्ष पी.एस. कांबळे म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याच्या दृष्टीने फार प्रयत्न झाले. पण फार काळ ऐक्य टिकले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आणण्यासाठी सर्वप्रथम रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटातील पुढा-यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. आणि जर ऐक्य झाले तर, रिपब्लिकन पार्टी एक प्रभावी पार्टी कोल्हापूर जिल्हयात

तयार होईल. आम्ही ऐक्यासाठी लागेल तो प्रयत्न करणार आहोत. दलित तरुणामध्ये या पक्षाविषयी आपुलकी आहे. प्रेम व जिव्हाळा आहे. परंतु गटा-तटाच्या बाबत आजचा तरुण निराश आहे. त्यासाठी तरुणामध्ये प्रबोधन करावे लागेल. ७५

त्यानी मांडलेल्या मताप्रमाणे रिपब्लिकन पक्षामध्ये ऐक्य होण्यासाठी प्रथम पुढाऱ्यात ऐक्य व त्याविषयीची भावना निर्माण होणे गरजेचे आहे. परंतु हे लोक आपले गट-तट विसरुन पक्षात ऐक्य व्हावे म्हणून कोणतेच प्रयत्न करत नाहीत. तर फक्त रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होण्यासाठी व्यापक प्रबोधनाची गरज आहे असे म्हणत असतात. असे सामान्य दलितांचे मत दिसून येते.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याबाबत बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) राज्य कार्यकारिणीचे सदस्य बाबासाहेब वड्डावकर म्हणाले की, कोल्हापूर जिल्हयात गवई, गट, आठवले गट, बी.सी.कांबळे गट, कवाडे गट, आंबेडकर गट (बाळासाहेब) इत्यादी रिपब्लिकन पक्षाचे गट असले तरी, आठवले गट प्रभावी असून कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात आमच्या संघटना मजबूत आहेत. परंतु असे असले तरी अल्प गटातील नेतृत्व करणाऱ्या बाकीच्या गट प्रमुखांना जवळ घेऊन ऐक्य अंमल करता येईल. १९९० साली ऐक्याच्या वेळी सर्व गट कोल्हापूर जिल्हयात एकत्र आले होते. व त्यातील आर.के. माळवी गवई गटातील जेष्ठ कार्यकर्ते सध्या जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती आहेत. म्हणूनच आम्ही या पक्षाच्या ऐक्याबाबत निश्चितपणे आम्ही प्रगती करु शकतो. ७६

असे मत त्यानी व्यक्त केले. परंतु रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) हा १९९० साली पक्ष ऐक्य झाल्यानंतर निर्माण झालेला पक्ष

आहे. त्या अगोदर रामदास आठवले हे दलित पँथर या दलितांच्या लढाऊ तरुण संघटनेमध्ये कार्य करत होते. १९९० ते १९९४ पर्यंत या पक्षाने कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची संघटना बांधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो आणि या पक्षातील जेष्ठ कार्यकर्ते बाबासाहेब वळ्ळाक्कर यांच्या मताप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील बाकीचे रिपब्लिकन पक्ष हे अल्प स्वरुपात असल्याचे त्या गटातील नेत्यानी आमच्या पक्षात येऊन सहभागी व्हावे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष मजबूत करावा असे त्यांचे मत आहे. आणि पक्ष ऐक्याबाबत आम्ही निश्चितपणे प्रगती करु शकतो असे ते म्हणतात.

तर रिपब्लिकन पक्ष कांबळे गटाचे कोल्हापूर जिल्ह्यातील एक सदस्य धर्मरक्षी म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांच्या नंतर पक्षात वेळोवेळी तडे गेले. व पक्षात फुटी पडल्या. नेतृत्वाच्या वादातून गेलेल्या तडांना केवळ मतलबी सौदाबाजी करणारे लाचार आणि अज्ञानी नेतृत्व जबाबदार आहेत. जनता ही बाबासाहेबांच्या विचाराशी एकनिष्ठ असून, नेतृत्वाने गद्दारी व सौदेबाजी केली आहे अशा नेतृत्वास एकत्र आणण्याचे भावनिक व प्रासंगिक प्रयत्न झाले असून ते निष्फळ ठरले आहेत. तेव्हा अनेक गटातटात दुभंगलेल्या जनतेला एकत्र आणण्यासाठी आंबेडकर विचारांचे जनजागरण नवीन माध्यमातून करुन आंबेडकरी विचाराचा रिपब्लिकन पक्ष नव्याने उभा करण्यासाठी पडेल तो त्याग करण्याची गरज आहे. [७७]

रिपब्लिकन पक्षाची एकी ही केवळ भावनिक व प्रासंगिक असते. आणि त्यामुळेच पक्षात ऐक्य झाले तरी ते फार काळ टिकू शकत नाही. त्यासाठी चांगल्या प्रकारचे नेतृत्व निर्माण होणे गरजेचे आहे. केवळ नेतृत्वाच्या हव्यासापाई जर गट टिकवून ठेवले तर हा पक्षाला चांगल्या प्रकारे जिल्ह्यात उभारता येणार नाही. त्यामुळे त्यासाठी निस्वार्थी व सर्व समावेशक नेतृत्व निर्माण

होऊन त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षात ऐक्य निर्माण झाले पाहिजे. तरच ते चांगल्या प्रकारे टिकून रिपब्लिकन पक्ष सामर्थ्यवान होऊ शकेल.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याबाबत बोलताना एक दलित समाजातील सामाजिक कार्यकर्ते वाय.डी. दीक्षीत म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी बाबासाहेबांचे विचार, कार्य, महात्मा फुले, शाहू महाराज, पेरियार आदि सामाजिक नेत्यांच्या चरित्राची, कार्याची माहिती सर्व भारतीय लोकांना विविध माध्यमातून मिळाली पाहिजे. छत्रपती शाहू महाराज यांनी पारतंत्र्याच्या काळात सत्तेचा वापर बहुजन समाजाच्या परिवर्तनासाठी व संघटित होण्यासाठी केला. आपणही सत्ताधारी नसलो तरी स्वत: बरोबर समाज उन्नतीचा परिवर्तनाचा व समाज कार्याचा आपल्या परीने वाटा उचललाच पाहिजे हे कार्य जीवनभर करण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. म्हणजे सामाजिक ऐक्य व पर्यायाने पक्षाचे ऐक्य होऊ शकेल. पक्ष ऐक्यासाठी परिपक्व नेतृत्वाची व समंजस समाजाची गरज आहे. अज्ञान समाज व अपरिपक्व नेतृत्व यातून रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होणार नाही. म्हणून परिपक्व नेतृत्वासाठी मा. काशिराम यांच्या संघटन नेतृत्वाचे अनुकरण करावे व विविध संघटना स्थापन करून पक्षाची कार्यपध्दती समाजापर्यंत पोहोचावी तरच भविष्यकाळात रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होईल व ते अनंत काळ टिकेल. ७८

अशी विविध प्रकारची मते रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटातर्फे व दलित समाजाच्या लोकांच्यातर्फे मांडली जातात. परंतु राष्ट्रीय पातळीवर व कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होत नाही आणि ते झाले तरी ते फार काळ टिकत नाही. याला खालील कारणे कारणीभूत आहेत.

(१) निस्वार्थी नेतृत्वाचा अभाव :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित समाजामध्ये कोणतीही सर्वसमावेशक नेतृत्व राहिले नाही. कारण रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यात ज्यानी प्रयत्न व प्रत्यक्ष पुढाकार घेतला त्या सर्वांच्याच आपापसात एकमेकावर उसना विश्वास व आदर होता. सर्व नेत्यानी एकमेका विरुद्ध या ना त्या कारणावरुन कुरबूर झालेली होती. गटबाजी झालेली होती. आडवा-आडवी झालेली होती आणि तू अधिक शहाणा की मी अधिक शहाणा अशा वाईट टोकाला पोहचणारी वादावादीही झालेली होती. प्रत्येक जण आघाताने अंतरंगात रक्तबंबाळ झालेला होता. बाबासाहेबांची मर्जी माझ्यावरच जास्त आहे असे सामान्य जनाना आणि सोबतच्या लोकांना दाखवणे. स्वत:चेच स्वत: मोठेपण सांगणे, प्रत्यक्षात नसताना अधिक मोठा पुढारी आहे असे भासवणे, स्वत:च्या बडेजावासाठी स्तुती करण्यासाठी भार बाळगणे, जनतेकडून जमलेल्या निधिचा मनमानेल तसा वापर करणे, आणि हिशेब तसेच दाबून टाकणे. अशा वाईट प्रकारच्या सवयी या पुढा--यांना लागलेल्या होत्या. परिणामी सर्वांच्याच बहुतांशी समान खोडी असल्याने एकमेकावर करघोडी करण्याच्या हेतूने व त्याद्वारे आपण स्वत:च एकमेव लायक आहोत असे लोकांना भासविण्याच्या हेतूने त्यांच्यातील वैमनस्य पराकोटीस जाऊन पोहोचले होते. ७९

त्यामुळे रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर यात अनेक गट पडू लागले आणि या गटात स्वार्थामुळे ऐक्य होऊ शकत नाही.

(२) दलित जनतेची निराशा :

रिपब्लिकन पक्षातील गटबाजी, स्वार्थीपणा नेत्याचा लाचारपणा इत्यादी गोष्टीला कंटाळून दलित जनता ही रिपब्लिकन पक्षाच्या मागे न

जाता ती इतर राजकीय पक्षाचा आश्रय घेऊ लागलेली आहेत आणि त्या इतर पक्षातून निवडणूका लढवून विजयी होत आहेत. त्यामुळे रिपब्लिकन पक्षात ऐक्य झाले तरी दलित समाज सर्वच्या सर्व या पक्षात येणार नाही परिणामी हा पक्ष दुर्बल व कमकुवतच रहाणार आहे.

(३) ऐक्यासाठी प्रयत्न नाहीत :

कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या एकीकरणासाठी कोणतेही प्रयत्न मोठया प्रमाणावर झालेले नसल्याने हा पक्ष अनेक गटातटाचेच राजकारण करत असताना दिसत आहे. फक्त ऐक्य व्हावे अशी भावना ठेवून पक्षाचे ऐक्य होऊ शकणार नाही. तर त्यासाठी कसोटीने प्रयत्न करावे लागतील.

वरील एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेतल्यास कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षात ऐक्य होऊ शकत नाही. आणि ते जर तात्पुरत्या स्वरूपात झाले तर फार काळ टिकू शकणार नाही. या सर्वांचा परिणाम म्हणजे रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्हयात चांगल्या प्रकारे रूजू शकणार नाही. त्यामुळे या पक्षाला कोल्हापूर जिल्हयात महत्त्वाचे स्थान नाही.

रिपब्लिकन पक्षास अनेक गट-तट व फुटी असल्याने निवडणुकीच्या काळात हा पक्ष स्वत:च्या सामर्थ्यावर लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, तालुका पंचायत, ग्रामपंचायत व सहकारी सोसायटयांच्या निवडणूकीत राष्ट्रीय पातळीपासून ते गाव पातळी पर्यंत यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे विविध गट निवडणुकीच्या काळात इतर पक्षाबरोबर युती करत असलेले दिसतात. युतिच्या माध्यमातून किंवा इतर राजकीय पक्षाच्या मदतीने रिपब्लिकन पक्ष निवडणुकीस त्या पक्षाचे सहकार्य घेऊन सहभागी होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्या "स्वतंत्र मजूर पक्ष" या राजकीय पक्षाची

स्थापना १५ ऑगस्ट १९३६ मध्ये केल्यानंतर ते म्हणाले होते की, इतर राजकीय पक्ष संघटनेपासून आमचा पक्ष सर्वस्वी स्वतंत्र राहिल. परंतु त्याचबरोबर जेथे सहकार्य होणे शक्य आहे. अशा कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर आमचा पक्ष सहकार्य करावयाला तयार होईल. [८०]

अशी इतर राजकीय पक्षाबरोबर सहकार्याची भूमिका डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केलेल्या वेळेपासूनच ठेवली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त केल्यानंतर "अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन" या पक्षाची स्थापना केली होती. या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला १९३७ च्या व १९४२ च्या निवडणुकीस फार मोठा पराभव पत्करावा लागलेला होता. त्यामुळे या पक्षाकडे दलित समाजातील लोक निराशेने पहात होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी वेळोवेळी उपदेशाचा सल्ला देऊन आपल्या पक्षातील लोकांचे मनोधैर्य वाढवण्याचा त्यानी प्रयत्न केला होता. व आपली झोपडी मोडून दुस-याचा हवेलीत प्रवेश करु नको, आपली झोपडी म्हणजे आपला पक्ष व स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन मधील कार्यकर्त्यांना बजावून सांगत होते. परंतु या पक्षाला निवडणुकीत मिळालेले प्रचंड अपयश व त्याच बरोबर भारतीय राजकारणात काँग्रेसला मिळालेले अभूतपूर्व यश यामुळे दलित समाजातील लोक व कार्यकर्ते शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन मधून फुटून जाऊन काँग्रेस पक्षाला मिळत होते. ही परिस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आल्यामुळे त्यानी कार्यकर्त्यांना उपदेश करताना असे सांगितले की, इलेक्शन ही क्रिकेटची मॅच आहे. क्रिकेटमध्ये पराभव झालेली टिम गाशा गुंडाळून स्वस्थ बसत नाही ती पुन्हा दुस-या वर्षी जोमाने खेळावयास प्रारंभ करते. असाच आशावाद आपण ठेवला पाहिजे. दोन वर्षापूर्वी लखनौला भाषण देत असताना मी सांगितले होते की, काँग्रेस हे जळते घर आहे. याचे

प्रत्यंतर तुम्हाला आले असेल त्यामुळे तुम्ही काँग्रेसमध्ये प्रवेश करु नका. [८१]

परंतु दलित समाजातील लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर काँग्रेस पक्षात जातच राहिले. तर सध्या अस्तित्वात असलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) व अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट) हे काँग्रेस पक्षाच्या माध्यमाने निवडणूका लढवत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष काँग्रेस बरोबर युती करुन राजकारणात निवडणूकीत उतरलेला दिसतो. याबाबत बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) कोल्हापूर जिल्हा सरचिटणीस मधूकर जाधव म्हणाले की, रिपब्लिकन पक्ष व इंदिरा काँग्रेस पक्ष यांची युती झाली आणि काँग्रेस सत्तेवर आले. काँग्रेसला वाटले की, काँग्रेस पक्षाची सत्ता राखावयाची असेल तर, रिपब्लिकन पक्षाशी युती करणे आवश्यक आहे. म्हणून राजकीय स्वार्थापोटी काँग्रेसने रिपब्लिकन पक्षाशी युती केली. दुसऱ्या बाजूने रिपब्लिकन पक्षाला असे वाटते की, काँग्रेसला सहकार्य केले नाहीतर जातीयवादी पक्ष सत्तेवर येतील आणि नेमके हे रिपब्लिकन पक्षाला नको आहे. एवढयाच एका विचारी व चांगल्या स्वार्थाने रिपब्लिकन पक्षाने काँग्रेसशी युती केली. तसेच काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने असे गृहित मानले की, मराठा वर्ग हा तसा कमी संख्येने आहे. तसेच वैचारिक दृष्टयाही कमी आहे. भाजप सारखा पक्ष हा रचनात्मक पायावर उभा आहे. त्यामुळे तो राजकीय सत्ता हातात घेईल आणि यातून सुटका करुन घेण्यासाठी दलित वर्गाच्या साहयाने काँग्रेसला आपली सत्ता टिकवणे आवश्यक होते. या अंतर्गत विचाराने आमच्या पक्षाने काँग्रेसशी युती केली. [८२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सतत काँग्रेस पक्षाला विरोध केला होता. कारण त्यावेळच्या काँग्रेसमध्ये भांडवलशाही विचाराचे व भांडवलदार लोकांचा प्रभाव काँग्रेस पक्षावर मोठया प्रमाणात होता. परंतु ही परिस्थिती

कालांतराने बदलत जाऊन कॉंग्रेस हा निधर्मी व सर्वसमावेशक बनला होता. त्यातच भा.ज.प. शिवसेना इत्यादी राजकीय पक्ष जातीय व धार्मिक आधारावर पुढे येत होते. त्यामुळे जातीयवादी पक्ष सत्तेवर येऊ नये म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाने १९९० च्या महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूकीच्या वेळी कॉंग्रेस पक्षाशी युती केली. याबाबत बोलताना रामदास आठवले म्हणतात की, "विधान सभेच्या वेळी कॉंग्रेसला पाठिंबा न देण्याची चुक केली असती तर, बाबासाहेबांच्या जन्म शताब्दीच्या वर्षात शिवसेना भाजपच्या जातीय वाघांच्या दाढेत महाराष्ट्राला दिल्याचे दूषण आपल्या डोक्यावर कायमचे राहिले असते. आणि इतिहासामध्ये आम्ही किती करंटे बेजबाबदार होतो हे काळ्याकुट्ट अक्षरानी लिहिले गेले असते. कॉंग्रेसला पाठिंबा दिल्यामुळेच कॉंग्रेस-रिपब्लिकन युतीचे सरकार आणण्याची व माझ्या सारख्यान एका कार्यकर्त्याला रिपब्लिकन पक्षाचा मंत्री म्हणून जाण्याची संधी मिळाली.[८३] त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यात देखील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) व कॉंग्रेस या पक्षाने युती करून जिल्हा परिषद व तालुका पंचायतीमध्ये थोडे फार यश या पक्षाने मिळवलेले दिसते.

कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाच्या इतर गटांची युतीबाबत भूमिका अशी होती की, याबाबत बोलताना रिपब्लिकन पक्ष कांबळे गटाचे सदस्य म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाचे स्थान अनन्यसाधारण आहे. या पक्षाची तत्वे देश सुजलाम, सुफलाम व सुखी करणारी आहेत. परंतु या पक्षामध्ये अनेक गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे त्यांची शक्ती विभागली गेली आहे. हे सर्व पक्षातील गटच एक्य येऊन त्यांची युती झाली तर जातीयवादी व धर्मांध पक्षाना हा पक्ष मोडीत काढील. परंतु या रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटात एकी होईल असे वाटत नाही.[८४]

अशी अनेक विविध मते रिपब्लिकन पक्षाने इतर राजकीय पक्षाबरोबर केलेल्या युतीबाबत मांडली जात आहेत. या इतर राजकीय पक्षाच्या युतीमुळे रिपब्लिकन पक्षाला कोल्हापूर जिल्ह्यात फार मोठा प्रभाव झालेला दिसत नाही. कारण लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या जिल्ह्यात राखीव मतदार संघ अस्तित्वात नाही व विधान सभेच्या निवडणुकीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव हा एकच मतदार संघ राखीव आहे. परंतु या मतदार संघात सतत कॉंग्रेस पक्षाद्वारेच दलित समाजातील नेते निवडणूकीत विजयी होत असलेले दिसतात. कारण संयुक्त मतदार संघाच्या पध्दतीमुळे जो दलित नेता इतर सवर्णांची मते जास्त मिळवू शकतो तीच व्यक्ती निवडणूकीत विजयी होऊ शकते. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या वेळी या कोल्हापूर जिल्ह्यातील मतदार संघातून मा. एस.के. डिगे व मा.दा.म. शिर्के यांनी निवडणूका जिंकल्या होत्या. परंतु त्यानी सुध्दा निवडणूकीत शेतकरी कामगार पक्ष व महाराष्ट्र एकीकरण समिती या प्रादेशिक पक्षाबरोबर युती केली होती. परंतु गेल्या ४ ते ५ विधान सभेच्या निवडणूकीत वडगाव मतदार संघातून कॉंग्रेसचाच उमेदवार विजयी होत असलेला दिसतो. मार्च, १९९४ मध्ये झालेल्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाकडून श्री जयंतराव आवळे हे विजयी झाले होते. तर रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराला अल्पमते पडली होती. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात जरी रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांनी विविध राजकीय पक्षाशी युती केली असली तरी याचा फायदा विधान मंडळाच्या निवडणूकीत होत नाही. मात्र जिल्हा परिषद तालुका पंचायत व ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला अल्पसे यश मिळते. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांना पक्ष युतीचा फारसा फायदा मिळाला नाही असे दिसून येते.

एकंदरीत कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचा विश्लेषणात्मक

आढावा घेतला असता रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्हयात कसेबसे आपले अस्तित्व टिकवून आहे असे दिसते. वास्तविकता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलित समाज हा राज्यकर्ती जमात बनावयाचा होता आणि दलितांना राजकीय सत्तेत सहभाग मिळवून द्यावयाचा होता व त्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष व अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन असे दोन राजकीय पक्ष निर्माण केले होते. परंतु निवडणूकींच्या मध्ये हा पक्ष फारशी कामगिरी बजावू शकला नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून त्यांना सर्व समावेशक व व्यापक आधारावर आधारित रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष निर्माण करावयाचा होता. परंतु दुर्दैवाने (दलित समाजाच्या) त्यांचे हे स्वप्न पूर्ण होण्याच्या आतच ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले. आणि त्यामुळे दलित समाजाचे सर्वमुखी नेतृत्व हरपले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" पक्ष स्थापन झाला. परंतु या पक्षातील अनेक गट, तट व संधिसाधूपणा यामुळे रिपब्लिकन पक्ष संपूर्ण देशात व कोल्हापूर जिल्हयात चांगल्याप्रकारे टिकू शकला नाही व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्हयात अस्तित्वात येऊ शकला नाही. कोल्हापूर जिल्हयाला छत्रपती शाहू महाराज, राजाराम महाराज यांच्या कार्याचा वारसा लाभलेला आहे. त्याच बरोबर शाहू महाराजांच्या प्रेरणेने हया वेळच्या जागृत झालेल्या दलित समाजातील नेत्यानी व कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जिल्हयातील दलित समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले असताना देखील डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्हयात अस्तित्वात का येऊ शकला नाही याबाबत रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटातील लोकांनी खालील प्रकारची मते मांडलेली आहेत.

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे (कांबळे) सदस्य वाय्.एस्. कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असणारा रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आलेला नाही. याचे कारण या पक्षातील प्रत्येक पुढाऱ्याला असे वाटते की, मी एकमेव बाबासाहेबांचा सच्चा अनुयायी आहे. तो अनुयायी असे म्हणत असतो की, बाबासाहेबांच्या नंतर लोकांनी मलाच बाबासाहेब म्हणावे, मीच दलितांचा पुढारी आहे. यामुळे प्रत्यक्षात बाबासाहेबांनी सांगितलेला मार्ग कोणीही आचरणात आणत नाही. [८५]

तर याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) बाबासाहेब वडावकर म्हणाले की, अद्याप बाबासाहेबांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आला नाही. सर्वसमावेशक, जाती-जमाती व धर्मांची कळक संवर्धित होत गेल्यास येत्या वीस ते पंचवीस वर्षांत निखळ रिपब्लिकन पक्ष उभा राहिल व देशात या पक्षाशिवाय दुसरा पर्याय असणार नाही. [८६]

तर याबाबत दलित मुक्ती आघाडीचे अे.बी. कांबळे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आला नाही. याला खालील कारणे आहेत.

१) खंबीर व कणखर नेतृत्वाचा अभाव.
२) पक्षाकडे आकर्षित होण्यासारखा परिणामकारक कार्यक्रमांचा अभाव.
३) केंद्रीय नेतृत्वाचा अभाव.
४) कार्यकर्त्यातील सत्तासंघर्षापायी सतत चढाओढ.
५) प्रत्येक नेत्याचा सवतासुभा.
६) स्व अस्तित्वाची चढाओढ.

७) स्वार्थी नेत्यांचा बाजार.

८) वैचारिक मतभिन्नता.

९) संघटन कुशलतेचा अभाव.

इत्यादी कारणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येऊ शकला नाही.

या सर्वांच्या परिणामामुळे व रिपब्लिकन पक्षाच्या झालेल्या खिळ-खिळया अवस्थेमुळे आज देशात आणि विशेषत: उत्तर प्रदेशात मा. काशिराम यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाज पार्टी अस्तित्वात येऊन या पार्टीने उत्तर प्रदेशातील सत्ता प्राप्त केलेली दिसते. या बहुजन समाज पार्टीचा जोर सर्वत्र वाढत चाललेला दिसतो. "डॉ. आंबेडकरांच्या नंतर या समाजाला पुढे नेणारे नेतृत्व निर्माण होउ शकले नाही. स्वत:च्या स्वार्थापोटी नेत्यांनी समाजाशी मोठा विश्वासघात केला. आज हे नेतृत्व टोलेजंग इमारती, हॉटेल्स्, दारूची दुकाने, इत्यादीत रममान झाले आहेत. समाजाच्या दारूण परिस्थितीला ते जबाबदार आहेत असे नेतृत्व बाबासाहेबांच्या आणि समाजाच्या आकांक्षा पूर्ण करु शकणार नाही. अन्याय अत्याचाराचा मुकाबला करण्याची शक्ती त्यांनी कधीच निर्माण केली नाही. हे नेतृत्व अत्यंत खुजे ठरले असून कालबाह्य झाले आहे. त्याला बदलूनच नवीन नेतृत्व करावे लागेल. खंबीर नेतृत्व असलेल्या संघटित समाजावर कोणीही वाकडया नजरेने पहाण्याची हिंमत करणार नाही. म्हणून असे नेतृत्व निर्माण करण्याची गरज आहे. [८७]

याचाच परिणाम म्हणून "बहुजन समाज पार्टी"कडे कोल्हापूर जिल्ह्यातील दलित समाजातील लोक आकर्षित होऊ लागले आहेत. कोल्हापूर जिल्हयात "बहुजन समाज पार्टी" रूजून तो चांगल्या प्रकारे अस्तित्व धारण करु शकेल का ? या विषयी कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षातील नेत्यांच्या प्रतिक्रिया

व्यक्त करताना सर्वच रिपब्लिकन पक्षाच्या लोकांनी आमच्या जिल्ह्यात "काशीराम" यांचे बहुजन समाज पार्टीचे अस्तित्व नगन्य आहे. अल्प आहे असे मत व्यक्त केले आहे. परंतु काशीराम यांचा पक्षाचे उत्तर प्रदेशातील मिळालेले यश पाहिले असता व त्यांच्या पक्षाला संपूर्ण भारतात मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पहाता कोल्हापूर जिल्ह्यातसुद्धा "बहुजन समाज पार्टी" हा पक्ष चांगल्या प्रकारे रुजेल अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. कारण रिपब्लिकन पक्षाला, पक्षाच्या नेतृत्वाला आणि पक्षातील फाटा-फुटीला व कोल्हापूर जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील दलित समाज कंटाळलेला व निराश झालेला आहे. त्यामुळे भविष्य काळात रिपब्लिकन पक्षाचे कोल्हापूर जिल्ह्यातील भवितव्य काय आहे ? असा प्रश्न साहजिकच निर्माण होऊ लागला आहे. या सर्व एकंदरीत परिस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्ष स्वत:चे अस्तित्व टिकवू शकेल काय ? आणि तो दलित, भटके विमुक्त, आदिवासी, ओ.बी.सी. समाजापर्यंत जाऊन पोहचून आपला प्रभाव जिल्ह्यात पाडू शकेल काय ? याबद्दल संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. आणि कोल्हापूर जिल्ह्यात तर रिपब्लिकन पक्षाचे भविष्य अंध:कारमय झालेले आहे. याबाबत बोलताना भारतीय रिपब्लिकन पक्षाचे (कांबळे गट) सदस्य वाय् एस् कांबळे म्हणाले की, "रिपब्लिकन पक्षाचे कोल्हापूर जिल्ह्यातील भवितव्य शून्य आहे. प्रत्येकजन सत्ताधारी पक्षामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाला चांगले भवितव्य नाही. [88]

अशाच अनेक प्रतिक्रिया कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या भवितव्याबाबत व्यक्त केल्या जात आहेत. याबाबत अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टीचे (आठवले) कार्यकारणी सदस्य म्हणाले की, सध्याचे एकूण कामकाज चळवळ आंदोलन यांचे मूल्यमापन केले असता वाटचाल चांगली असून येत्या दशकात

ग्रामीण भागात आमचे नेतृत्व पक्के होईल. ८९

तर कोल्हापूर जिल्हयातील भवितव्याबाबत बोलताना अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष गवई गटाचे जिल्हाध्यक्ष पी.एस्. कांबळे म्हणाले की, कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाला उज्ज्वल भविष्य काळ आहे. परंतु काही काळ अधिक श्रम करावे लागतील. ९०

अशा विविध प्रतिक्रिया कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या भवितव्याबाबत व्यक्त केल्या जात आहेत. परंतु एकंदरीत कोल्हापूर जिल्हयातील काँग्रेस, जनता दल, शिवसेना, भारतीय जनता पक्ष यांचा वाढता प्रभाव व कोल्हापूर जिल्हयातील दलितांचा इतर पक्षाकडे असलेला कल पहाता कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाला चांगले भवितव्य नाही असे म्हणता येईल.

परंतु कोल्हापूर जिल्हयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येण्यासाठी खालील बाबींचा अवलंब करावा लागेल.

(१) <u>पक्षाचे नेतृत्व सर्वसमावेशक करणे</u> :

कोल्हापूर जिल्हयातील सर्व दलितांना व मागासलेल्या लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराप्रमाणे पुढे नेणारा आणि निस्वार्थी, कळकळीचा व त्यागी वृत्तीचा नेता किंवा नेतृत्व तयार झाले पाहिजे.

(२) <u>पक्षाच्या संघटना तयार झाल्या पाहिजेत</u> :

रिपब्लिकन पक्षाने मजूर, कामगार, स्त्री, विद्यार्थी, शेतमजूर इत्यादी पातळीवर पक्षाच्या संघटना निर्माण झाल्या पाहिजेत व त्यामधून चांगले कार्यकर्ते निर्माण होऊन पक्ष वाढीस लागला पाहिजे.

(६) पक्ष नेत्यानी जनतेत मिसळले पाहिजे :

सध्या कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाचे स्वरुप पाहिले असता असे दिसते की, रिपब्लिकन पक्षाचे नेते एका बाजूला तर दलित जनता एका बाजूला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती बदलून दलित समाजाच्या अडी-अडचणींशी समरस होऊन त्या सोडविण्याच्या दृष्टि-कोनातून प्रामाणिकपणे प्रयत्न झाले पाहिजेत तरच रिपब्लिकन पक्षात सर्व दलितांचे सहकार्य मिळेल व ते दुसऱ्या इतर राजकीय पक्षाकडे आकर्षित होणार नाहीत.

कोल्हापूर जिल्हयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून जर साकार करावयाचे असेल तर वरील बाबींचा काटेकोर-पणे अंमलबजावणी केली पाहिजे.

तरच कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाला चांगले भवितव्य येऊ शकेल.

.......

## स मा रो प :

कोल्हापूर जिल्हा हा सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रातील इतर जिल्हयापेक्षा फारच पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. महात्मा जोतीबा फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिन्दे यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात बहुजन समाजासाठी मोलाचे कार्य केले आहे. शाहू महाराजांनी बहुजन समाजाची उन्नती व्हावी, त्यांना चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे म्हणून अनेक स्वरूपाची कार्ये केली आहेत. पेशावाईच्या कालखंडापासून संपूर्ण महाराष्ट्रात व कोल्हापूर संस्थानात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व मोठया प्रमाणावर वाढलेले होते. या वर्चस्वाच्या भावनेमुळे बहुजन समाजाची पदो-पदी पिळवणूक केली जात असे. जन्म वंशात्वाच्या श्रेष्ठत्वाने ब्राम्हण लोकांचा प्रभाव संपूर्ण समाजावर झालेला होता. त्यांना बहुजन समाज व अस्पृश्य समाज हा अज्ञानीच राहिला पाहिजे तरच आपले वर्णश्रेष्ठत्व टिकवू शकू असे ब्राम्हण समाजाला वाटत होते. परंतु महात्मा जोतीबा फुले यांच्या रूपाने सर्वप्रथम महाराष्ट्रात या वर्णश्रेष्ठत्वाला तडा जाऊ लागला. बहुजन समाजाचे अज्ञान दूर व्हावे, त्यांच्यातील अंध:श्रध्दा दूर व्हाव्यात आणि बहुजन समाज सुशिक्षित होऊन राजकारणात सहभागी व्हावा यासाठी महात्मा फुले यानी आपल्या आयुष्यात फार मोठे प्रयत्न केले व त्यांच्याच वारसा कोल्हापूर जिल्हयात (संस्थानात) शाहू महाराज चालवू लागले. त्यांनी सहकार, शिक्षण, व्यापार, खेळ, दलितांसाठी कायदे या माध्यमाने बहुजन समाजात जागृती आणण्यास सुरवात केली होती. त्यांचे दलितावरील व इतर मागासलेल्या वर्गाच्या जागृतीचे कार्य वादातीत आहे. त्यांच्या प्रयत्नाने सर्वप्रथम कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यता नष्ट झाली. त्यानी अस्पृश्यांना निरनिराळया नोक-या देऊन, त्यांना निरनिराळया उद्योगाना आर्थिक सहाय्य देऊन दलितांच्यात त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला. त्यानी दलितांच्या विद्यार्थ्यासाठी वसतिगृहे स्थापन

करून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. या शिवाय त्यांच्या प्रोत्साहनामुळे दलित समाजात अनेक सुधारक कार्यकर्ते तयार झाले. गंगाधर यशवंत पोळ, पंजाबराव हलस्वार, दत्तोबा पवार, भास्कर गंगाराम कांबळे, दा.म. शिर्के इत्यादी दलित समाज सुधारक पुढे आले आणि ते शाहू महाराजांच्या सहकार्याने कोल्हापूर संस्थानात दलित समाजामध्ये जागृतीचे कार्य करू लागले होते.

याच कालखंडामध्ये एक ऐतिहासिक घटना घडली की, वर्तमान पत्रातून शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांच्या विषयी माहिती समजली की, एक महार समाजातील व्यक्ती एम्.ए., पीएच्.डी. होऊन परदेशातून उच्च शिक्षण घेऊन आली आहे. शाहू महाराज हे दलित सुधारक असल्याने त्यांना या गोष्टीबद्दल आश्चर्य वाटले व साहजिकच याचा त्यांना आनंद झाला. त्यामुळे स्वत: शाहू महाराज डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी मुंबई विभागातील परळ येथे गेले होते. त्यांची भेट घडून आल्यानंतर शाहू महाराजानी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना कोल्हापूर भेटीचे निमंत्रण दिले.

त्यानंतर कोल्हापूर संस्थानातील दलित नेत्यांनी विचार विनिमय करून "माणगाव" (कोल्हापूर) येथे पहिली दलित परिषद घेण्याचे ठरविले. व या परिषदेला डॉ. आंबेडकरांना निमंत्रित करण्याचे ठरविले. या आमंत्रणाला मान देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर २० मार्च, १९२० रोजी माणगाव येथे परिषदेसाठी हजर झाले. या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ मार्च, १९२० रोजी छत्रपती शाहू महाराज माणगाव येथे परिषदेसाठी हजर झाले होते. या परिषदेत छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना आता तुम्हीच दलितांच्यासाठी व्यापक कार्य सुरु करा असा सल्ला भाषणातून दिला होता.

या भाषणातून स्फूर्ती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "बहिष्कृत

हितकारिणी सभा" या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून दलित समाजात जागृती होऊ लागली. या संघटनेचे घोषवाक्य "शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा" हे होते आणि या ध्येयाप्रमाणे दलित समाज संघटित होऊ लागला होता. डॉ. आंबेडकरांनी १५ ऑगष्ट, १९३६ रोजी "स्वतंत्र मजूर पक्ष" या पहिल्या राजकीय पक्षाची स्थापना केली. परंतु या संघटनेचे कार्यकर्ते फक्त शहरांच्या पुरतेच मर्यादित असल्याने तो संपूर्ण ठिकाणी पोहचू शकला नाही. नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" या दुस-या राजकीय पक्षाची स्थापना केली. या संघटनेमध्ये कोल्हापूर संस्थानातील एस्.के.डिगे, दा.म. शिर्के, माई कुरणे, रतन कांबळे, चिंतामण कांबळे, स.म.काळे इत्यादी लोकांनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या माध्यमाने भरीव कामगिरी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर दि. ३.१०.१९५७ रोजी "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया"ची स्थापना करण्यात आली. त्यावेळी कोल्हापूर जिल्हयातील सर्व दलित कार्यकर्ते व शेडयूल्ड कास्ट फेडरेशनमधील कार्यकर्ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियात सामिल झाले.

परंतु कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्याचा आढावा घेतल्यास असे दिसते की, या पक्षात अनेक गट राष्ट्रीय पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत फुटलेले आहेत. या पक्षाची हानी झालेली आहे. या पक्षात दौर्बल्य प्राप्त झाले आहे आणि दलित समाजातील शक्ती या रिपब्लिकन पक्षाच्या विविध वाटात विभागली गेली आहे.

त्यामुळे कोल्हापूर जिल्हयातील फार मोठा दलित समाज इतर राजकीय पक्षाकडे वळत असलेला दिसत आहे. या सर्व गोष्टींच्यामुळे कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाचे भवितव्य अंधःकारमय व निराशाजनक झालेले दिसते.

त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्ह्यात अस्तित्वात येऊ शकलेला नाही.

......

## प्रकरण चौथे

## संदर्भ सूची


१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, (कोल्हापूर जिल्हा) अर्थ व सांख्यिकी, संचनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२-९३, पृ.क्र. १.

२. महाराष्ट्र राज्य गॅझोटिअर, संपा. कि.का.चौधरी, प्रकाश कार्यकारी संपादक व सचिव, महाराष्ट्र राज्य, १९८९, पृ.क्र. २.

३. प्रा.व्ही.बी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८६, पृ.क्र. १२३.

४. डॉ. गणपतराव सुर्यवंशी, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ.क्र. ६२.

५. डॉ. गणपतराव सुर्यवंशी, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ.क्र. ७७.

६. दा.म. शिर्के (लेख), राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ.क्र.४९५.

७. दा.म.शिर्के (लेख) शाहू महाराज गौरवग्रंथ, प्रकाशकमहाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ.क्र. ५०३.

८. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ७.

९. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. २३.

१०. शेडयूल्ड कास्ट फेडरेशन कोल्हापूर जिल्हा, प्रचार पत्रिका, रत्नाकर प्रेस, कोल्हापूर, १.४.१९५४.

११. शेडयूल्ड कास्ट फेडरेशन, कार्यक्रम पत्रिका, आनंद छापखाना, कोल्हापूर.

१२. शिरोळ तालुका दलित परिषद, कुरुंदवाड, १४.२.५४ चा वृत्तांत.

१३. दलित फेडरेशन शिरोळ तालुका, कुरुंदवाड, १४.२.५४ चा वृत्तांत, पृ.क्र. २.

१४. दलित फेडरेशन शिरोळ तालुका, कुरुंदवाड १४.२.५४ चा वृत्तांत, पृ.क्र. ३ व ४.

१५. कागल तालुका दलित परिषद, कार्यक्रम पत्रिका, शहाजी प्रिंटिंग प्रेस लक्ष्मीपुरी, मोटर स्टँड जवळ, कोल्हापूर, २०.३.१९५४.

१६. हातकणंगले तालुका दलित परिषद, कार्यक्रम पत्रिका, प्रतिभा प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर, १२.५.१९५४.

१७. गडहिंग्लज तालुका दलित परिषद, कार्यक्रम पत्रिका, प्रतिभा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर, २५.५.५४.

१८. सि.पी. कुरणे यांचा अप्रकाशित एम्.फिल्. प्रबंध, लाईफ ॲन्ड वर्क ऑफ दादासाहेब शिर्के, डिसेंबर, १९९३, पृ.क्र. १३३.

१९. उपरोक्त, पृ.क्र. १३८.

२०. उपरोक्त, पृ.क्र. १३९.

२१. संपा. विकशेठ पाटील, कोल्हापूरची मोठी माणस, प्रकाशक एस्.डी. पाटील, कोल्हापूर, १९८३, पृ.क्र. २२६.

२२. साप्ताहिक प्रबुध्द भारत, कार्य. संपादक शंकरराव खरात, मुंबई, दि. १०.१०.१९५९ पृ.क्र. ८.

२३. प्रबुध्द भारत, कार्य. संपादक शंकरराव खरात, मुंबई दि. ४.१.१९५८ पृ.क्र. २.

२४. मा.ई. कुरणे गौरव अंक, संपादक रमेश टावरे / भैरव कुंभार, प्रकाशक बी.एम्. पाटील, कोल्हापूर, १९८९, पृ.क्र. १४.

२५. "रत्न" स्मरणिका, संपादक आयु. श्रीनिवास शिर्के व इतर, कोल्हापूर, १९९३, पृ.क्र. २८.

२६. बाबासाहेब वडगावकर यांच्या मुलाखतीवरून.

२७. बी.डी. ठिकपूर्ले यांच्या मुलाखतीवरून.

२८. र.भि. धर्मरक्षी -"-

२९. जालंदर जमादार -"-

३०. एस्.के. कांबळे -"-

३१. अशोक बळी कांबळे -"-

३२. दैनिक पुढारी, कोल्हापूर २७ डिसेंबर, १९९३, पृ.क्र. ३.

३३. दैनिक मँचेस्टर, इचलकरंजी, दि. १८.१२.९३, पृ.क्र. ५.

३४. दैनिक सकाळ कोल्हापूर, दि. २५.१२.८७, पृ.क्र. ३.

३५. जी.एल्. भिडे / एन्.डी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. १०१.

३६. पी.एस्. कांबळे यांची मुलाखतीवरुन.

३७. मधूकर जाधव यांच्या मुलाखतीवरुन.

३८. जालंदर जमादार यांच्या मुलाखतीवरुन.

३९. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कलठाणाकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६३.

४०. संपा. प्रा. अशोक नाइकवाडे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्ञानेश प्रकाशन, बीड, १९९१, पृ.क्र. ५६.

४१. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कलठाणाकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६६.

४२. दैनिक केसरी, कोल्हापूर, दि. १४.५.१९९२, पृ.क्र. ५.

४३. जी.एल्. भिडे / एन्.डी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. १४.

४४. उर्मिला पवार / मिनाक्षी मून, आम्हीही इतिहास घडवला, प्रकाशक मुंबई, १९८९, पृ.क्र. १४.

४५. उर्मिला पवार / मिनाक्षी मून, आम्हीही इतिहास घडविला, प्रकाशक मुंबई, १९८९, पृ.क्र. ७६.

४६. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कलठाणाकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६५.

४७. दैनिक पुढारी, कोल्हापूर , १५ ऑगस्ट, १९९३, पृ.क्र. ४.

४८. पी.एस्. कांबळे यांच्या मुलाखतीवरुन.

४९. बी.डी. ठिकपुर्ले यांच्या मुलाखतीवरून.

५०. नामदेव कांबळे यांच्या मुलाखतीवरून.

५१. निवेदनाचे हस्तलिखित पत्रक, बाबासाहेब वड्गावकर, दि.१.३.९३.

५२. दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. १२.७.१९९२, पृ.क्र. ३.

५३. प्रबुध्द भारत (साफा) कार्य. संपादक शंकरराव खरात संपा. प्रबुध्द भारत १०.१०.५९, पृ.क्र. २.

५४. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.क्र. २४.

५५. बी.डी. ठिकपुर्ले यांच्या मुलाखतीवरून.

५६. बाबासाहेब वड्गावकर यांच्या मुलाखतीवरून.

५७. जालंदर जमादार यांच्या मुलाखतीवरून.

५८. पी.एस. कांबळे यांच्या मुलाखतीवरून.

५९. पी.एल. भिडे/एन्.डी. पाटील, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. १०६.

६०. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२-९३, पृ.क्र. २१ व २२.

६१. बाबासाहेब वड्गावकर यांची मुलाखत.

६२. एस.एम्. कांबळे यांची मुलाखत.

६३. "रत्न" स्मरणिका, ९३, संपादक श्रीनिवास शिर्के व इतर, कोल्हापूर १९९३, पृ.क्र. २९.

६४. बाबासाहेब वडगावकर यांच्या मुलाखतीवरुन.

६५. नामदेव कांबळे यांच्या मुलाखतीवरुन.

६६. उर्मीला पवार/मिनाक्षी मून, "आम्हीही इतिहास घडवला" मुबई, १९८९, पृ.क्र. ४१.

६७. नामदेव कांबळे यांच्या मुलाखतीवरुन.

६८. पाक्षीक "क्रांतीपुत्र" संपादक बाबासाहेब वडगावकर, कोल्हापूर, १४ एप्रिल, १९८९, पृ.क्र. १.

६९. मधुकर जाधव याची मुलाखत.

७०. धर्मरक्षी यांची मुलाखत.

७१. आर.एम्. कांबळे यांची मुलाखत.

७२. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे हस्तलिखित मोर्चाचा वृत्तांत.

७३. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिकलठाणकर, नाथ प्रकाशन, पहिली आवृत्ती, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र.५५.

७४. दलित मित्र मा.ई. कुरणे गौरव अंक, प्रकाश.बी.एस्.पाटील, कोल्हापूर, १९८९, पृ.क्र. ३१.

७५. पी.एस्. कांबळे यांच्या मुलाखती आधारे.

७६. बाबासाहेब वडगावकर यांच्या मुलाखती आधारे.

७७. धर्मरक्षी यांच्या मुलाखती आधारे.

७८. वाय्.डी. दिक्षित यांच्या मुलाखती आधारे

७९. माणगाव परिषद विशेष अंग, संपादक प्रा. रमेश टावरे, कोल्हापूर, १९८२, पृ.क्र. ४०.

८०. श्री कृष्णा मेणसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, लोक वाङ्मय गृह मुंबई, १९९२, पृ.क्र. २९.

८१. संपादक मा.फ. गांजरे, डॉ. बाबासाहेबांची भाषणे, खंड ६वा, प्रकाशक मा.फ. गांजरे, नागपूर, १९८२, पृ.क्र. ९६.

८२. मधूकर जाधव यांच्या मुलाखती आधारे.

८३. भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपादन शरणकुमार लिंबाळे, प्रकाशक नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ३५८.

८४. वाय.एस. कांबळे यांच्या मुलाखतीच्या आधारे.

८५. -"- -"-

८६. बाबासाहेब वड्गावकर यांच्या मुलाखतीच्या आधारे.

८७. साप्ताहिक "बहुजन वाचक" संपादक काशीराम, नागपूर, ९ आक्टोबर, १९८३, पृ.क्र. ५.

८८. वाय.एस. कांबळे यांच्या मुलाखतीच्या आधारे.

८९. बाबासाहेब वड्गावकर, यांच्या मुलाखतीच्या आधारे.

९०. पी.एस. कांबळे यांच्या मुलाखतीच्या आधारे.


.......

## मुल्यमापन

हिंदुस्थानात प्राचीन काळापासून अस्पृश्यतेची प्रथा सुरु आहे. त्यांना सर्वप्रकारचे हक्क व न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न फार कमी झाले होते. मध्ययुगीन महाराष्ट्रात निर्माण झालेल्या संत परंपरेने अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामुळे अस्पृश्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळू शकला नाही.

हिंदुस्थानात ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी देशातील लोकांना आधुनिक प्रकारचे शिक्षण देण्यासाठी अनेक शाळा व महाविद्यालये स्थापन केली. शिक्षणासाठी त्यांनी विशेष खर्चाची तरतुद केली. त्यामुळे या सर्वांचा परिणाम म्हणून हिंदुस्थानातील पहिली सुशिक्षितांची "आधुनिक पद्धतीचे शिक्षण घेऊन समाजात कार्य करु लागली. या समाजसुधारकांना आद्य समाज सुधारक असे म्हटले जाते. त्यामध्ये गो.ह. देशमुख, विष्णुशास्त्री पंडित, इत्यादींचा समावेश होतो. त्यानी लेखनाद्वारे विचार मांडून अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याना फारसे यश मिळाले नाही. तरी सुद्धा त्यांच्या प्रयत्नामुळे समाजात जागृती होऊ लागली.

खऱ्या अर्थाने बहुजन समाजात व मागासवर्गीयात सुधारणा व्हाव्यात, त्यांना शिक्षण मिळावे व त्याद्वारे अस्पृश्यांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळावा म्हणून महात्मा फुले यांनी "सत्यशोधक समाज" ही स्थापन करुन बहुजन समाजाला व अस्पृश्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्य समाजात चांगल्या प्रकारची जागृती होऊ लागली. त्यांना आपल्या हक्कांची, व आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणिव झाली. यामुळे अस्पृश्य समाजातील लोक आपल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी पाठवू लागले आणि अस्पृश्य समाज सुशिक्षित होऊन डोळसपणे समाजाकडे पाहू लागला.

इ.स. १८९० साली महात्मा फुले यांच्या कार्याच्या प्रभावामुळे "गोपाळ बाबा वलंगकर" या अस्पृश्य समाजातील पहिल्या व्यक्तिने "अनार्य दोष-परिहार मंडळी" या नावाची संस्था स्थापन करुन अस्पृश्यांत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

२७ नोव्हेंबर, १८९० रोजी महात्मा फुले यांचा मृत्यू झाल्याने अस्पृश्यांच्या व्यापक हिताचा प्रश्न बाजुला पडला होता. परंतु हे कार्य "कर्मवीर विठ्ठल रामजी शिन्दे" यांनी आपल्या शिरावर घेऊन अस्पृश्यांच्या हितासाठी कार्य करण्यास सुरवात केली. त्यानी १९०६ साली "डिप्रेस्ड क्लासेस मिशन संस्था" स्थापन करुन त्या माध्यमाने अस्पृश्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला.

महात्मा जोतीबा फुले व कर्मवीर शिन्दे यांच्या कार्यापासून स्फुर्ती घेऊन बहुजन समाजासाठी व अस्पृश्यांना आर्थिक, सामाजिक व राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांना सर्व प्रकारचे हक्क, अधिकार मिळवून देण्यासाठी व्यापक अर्थाने प्रयत्न करणारे म्हणून कोल्हापूर संस्थानातील "छत्रपती शाहू महाराज" यांना श्रेय द्यावे लागते. केवळ त्यांच्या प्रयत्नामुळे व त्यांनी राबविलेल्या धोरणांच्यामुळे कोल्हापूर संस्थानात अस्पृश्य समाजातील पहिली सुधारकांची पिढी तयार होऊन अस्पृश्यांच्यासाठी कार्य करु लागली होती.

डॉ. आंबेडकरांचा कोल्हापूर संस्थानाशी परिचय शाहू महाराजांच्यामुळे झाल्याने कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य समाजाला एक प्रकारचे चैतन्य प्राप्त झाले होते. छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य अधिक मोठ्या प्रमाणावर जागृत झाला. त्यांना आपल्या परिस्थितीची जाणिव होऊन ते समाजात सर्व प्रकारचे (सामाजिक, आर्थिक व राजकीय) हक्क प्राप्त करुन घेण्यासाठी संघर्ष करु लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या "बहिष्कृत हित-कारिणी सभा" या संस्थेद्वारे होणाऱ्या सामाजिक चळवळींना कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य समाजाने फार मोठा प्रतिसाद दिलेला दिसतो. १५ ऑगस्ट, १९३६ साली निर्माण झालेला "स्वतंत्र मजूर पक्ष" याचे कार्य देशातील काही शहरांच्या पुरते मर्यादित राहिले होते. या पक्षाने चांगल्या प्रकारच्या संघटना निर्माण केल्या नाहीत. परिणामी हा पक्ष देशात चांगल्या प्रकारे रूजू शकला नाही. कोल्हापूर संस्थानात देखिल या पक्षाचे अस्तित्व यामुळे जाणवले नाही.

निवडणूकीत झालेल्या पराभवामुळे व ब्रिटिशांनी १९३५ चा कायदा हिंदुस्थानात लागू केल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातीय आधारावर एक नवा पक्ष स्थापन करण्याची गरज वाटू लागली. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष हा पक्ष बरखास्त करून २० जुलै, १९४२ रोजी ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना केली. या पक्षाची संघटना कोल्हापूर संस्थानात निर्माण होऊन त्याचे कार्य व्यापक प्रमाणात चालू लागले. १९५२ व १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाला चांगल्या प्रकारे यश प्राप्त झाले होते. या पक्षातून कोल्हापूर जिल्ह्यातील एक खासदार व एक आमदार निवडून आले. याशिवाय जिल्हा लोकल बोर्ड, म्युनसिपल इत्यादी क्षेत्रात शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षातर्फे प्रतिनिधित्व मिळू लागले. परिणामी कोल्हापूर जिल्ह्यात हा पक्ष अत्यंत सामर्थवान बनला होता.

परंतु राष्ट्रीय पातळीवर या पक्षाला प्रचंड मोठा पराभव पत्करावा लागला. कारण संयुक्त मतदार पध्दतीमुळे जी व्यक्ति सवर्ण मतदारांची जास्त मते मिळवील तोच उमेदवार निवडणुकीत यशस्वी होऊ लागला होता. त्यामुळे देशातील अनेक अस्पृश्य या पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे वळू लागले. परिणामी

या पक्षातील कार्यकर्त्यांच्यामध्ये निराशेची भावना पसरत गेली. या पक्षाला स्थापनेपासुन फार मोठे यश मिळाले नव्हते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे कळून आले की, आता देशात जातीय आधारावर पक्षाची गरज उरलेली नाही. फक्त जातीय आधारावर हा पक्ष टिकू शकणार नाही. त्यामुळे आपण हा पक्ष बरखास्त करुन सर्वव्यापक व सर्व जाती-जमातींना सामावून घेणारा "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष स्थापन करावा असे वाटू लागले. परंतु हा पक्ष स्थापन करण्यापूर्वीच त्यांच्या मृत्यू झाला.

देशातील अस्पृश्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांचे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी "ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" हा पक्ष बरखास्त करुन ३ ऑक्टोबर, १९५७ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष स्थापन केला. त्यामुळे कोल्हापूर जिल्हयातील शेडयूल्ड कास्ट फेडरेशन मधील लोक या नवीन पक्षात सामिल झाले व या पक्षाच्या माध्यमाने कार्य करु लागले.

रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासून अवघ्या दोनच वर्षात या पक्षात फुटिला सुरवात झाली. नेतृत्वातील संघर्ष, सर्वसमावेशक व नि:स्वार्थी नेत्यांची उणिव, इतर राजकीय पक्षाचे वाढते वर्चस्व इत्यादी कारणामुळे या पक्षात अनेक गट-तट निर्माण होऊन कोल्हापूर जिल्हयातील अस्पृश्यांची राजकीय ताकद कमी झाली. परिणामी हा पक्ष कोल्हापूर जिल्हयात सामर्थवान राहिला नाही. त्यातच डॉ. आंबेडकरांच्या कार्यामुळे प्रभावित झालेले कार्यकर्ते वयस्कर व काळाच्या पडद्याआड जावू लागल्याने या पक्षाला कोल्हापूर जिल्हयात उतरती कळा लागली. या सर्वांचा परिणाम म्हणून कोल्हापूर जिल्हयात अस्पृश्य समाज हा राजकीयदृष्टया प्रभावहिन ठरु लागला आहे. आज कोल्हापूर जिल्हयात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट असलेले दिसतात. या सर्व

गटातटांना एकत्र आणून व कोल्हापूर जिल्हयातील सर्व दलित, इतर मागासवर्गीय यांना रिपब्लिकन पक्षाद्वारे राजकीय दृष्टया संघटीत करण्यासाठी व दलितांना विविध ठिकाणी योग्य ते प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी काय करता येईल ? व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न कोल्हापूर जिल्हयात कसे साकार होऊ शकेल ? कारण कोल्हापूर जिल्हयाला छत्रपती शाहू महाराज, राजाराम महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जुने नि:स्वार्थी दलित कार्यकर्ते यांच्या कार्याचा वारसा लाभलेला असताना कोल्हापूर जिल्हयातील सर्व दलित इतर मागासवर्गीय "रिपब्लिकन" या पक्षाच्याद्वारे संघटित होतील काय ? याचा आढावा विविध मुलाखतीतून घेतल्यानंतर असे जानवते की, या पक्षाने व्यापक प्रमाणावर कोल्हापूर जिल्हयात कार्य केली नाहीत की, त्याद्वारे दलित समाज या पक्षाकडे आकर्षित होईल. या पक्षाच्या विविध गटांच्याकडून पक्ष ऐक्यासाठी स्थानिक पातळीवर व जिल्हा पातळीवर प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे अनेक गट-तट अस्तित्वात राहिले आहेत. कोल्हापूर जिल्हयात या पक्षाने मजूर, कामगार, शेतकरी, स्त्रिया इत्यादिंच्या संघटना व्यापक प्रमाणावर तयार केलेल्या नाहीत. याशिवाय समाज जागृतीचे व दलितांच्या जिव्हाळयाचे प्रश्न या पक्षाने कमी प्रमाणात सोडविले. त्यामुळे या पक्षात कोल्हापूर जिल्हयातील सर्व दलित सहभागी नाही. या जिल्हयातील अनेक दलित कॉंग्रेस, शिवसेना, भा.ज.प., बहुजन समाज पार्टी या पक्षाकडे आकर्षित झालेले आहेत. कोल्हापूर जिल्हयातील रिपब्लिकन पक्षातील पुढारी सुध्दा फार मोठया उत्साहाने पक्ष वाढीस लागावा व पक्षात ऐक्य व्हावे आणि आपल्या पक्षाचे सामर्थ फार मोठया प्रमाणावर जिल्हयात वाढीस लागावे यासाठी तळमळीने कार्य करत नाहीत असे दिसते.

मा. काशिराम यानी "बहुजन समाज पक्ष" हा पक्ष स्थापन करून उत्तर प्रदेशातील सर्व दलित, भटके-विमुक्त व इतर मागासवर्गीय यांना एकत्रित करून उत्तर प्रदेशातील सत्ता हस्तगत केलेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना

आपली जमात राज्यकर्ती जमात व्हावी असे वाटत असे, त्यासाठी त्यांनी रिपब्लिकन पक्षाची आदर्श घटना सुध्दा लिहिली होती. परंतु त्यांचे दुर्दैवाने निधन झाल्यामुळे त्यांना हे स्वप्न पूर्ण करता आले नाही. परंतु डॉ. आंबेडकरांच्या तालमित तयार झालेल्या लोकांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. परंतु अनेक कारणांच्यामुळे व आपापसातील संघर्षामुळे, हेव्यादाव्यामुळे या पक्षाचे सामर्थ्य वाढू शकले नाही. कोल्हापूर जिल्ह्यातही पर्यायाने या पक्षाला चांगले स्थान प्राप्त झाले नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचा एकंदरित आढावा घेतला असता या पक्षात जोपर्यंत ऐक्य होत नाही. या पक्षात सर्व दलित, इतर मागासवर्गीय व भटके विमुक्त आणि इतर पक्षात गेलेले दलित जोपर्यंत या पक्षात येऊन सामिल होत नाहीत, आपल्या पक्षाची संघटना कार्यक्षम करीत नाहीत तोपर्यंत या पक्षाला कोल्हापूर जिल्ह्यात चांगल्या प्रकारचे भवितव्य नाही व कालांतराने हा पक्ष मागे पडून त्याचे अस्तित्व कमी होईल असे वाटते. सध्या कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे भवितव्य अंध:कारमय आहे.

......

## संदर्भ ग्रंथ




१) कांबळे अरुण - संपादक जनता पत्रातील लेख, प्रकाशक रामदास आठवले, मुंबई, १९९२.

२) कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाश, मुंबई, १४ एप्रिल, १९६६.

३) कुबेर वा.ना. - डॉ. आंबेडकर विचार मंथन, प्रकाशक आर.जी. देसाई, मुंबई, १९८२.

४) कुलकर्णी दत्ता जी. - महात्मा फुले समाज क्रांतिचा अग्रदूत, रघुवंशी प्रकाशन, पुणे, १९७८.

५) खरात शंकरराव - अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, प्रकाशन मेसर्स जोशी आणि लोखंडे.

६) खैरमोडे चांगदेव भवानराव- प्रकाशक कुलकर्णी दामोदर दिनकर, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे, १९८८.

७) गणवीर रत्नाकर (संपादक) - बहिष्कृत भारतातील अग्रलेख, रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ, १९८०.

८) गवळी टी.रा.(संपादक) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९१.

९) गांजरे म.का. (संपादक) - डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६ वा प्रकाशक गांजरे म.का., नागपूर, १९८२.

१०) जाधव भावानराव बापुसाहेब (संपादक) - राजर्षि शाहू महाराजांची भाषणे, प्रकाशक जाधव म.बा., कोल्हापूर, १९७१.

११) जंजाळ प्रकाश - आंबेडकर क्रांतिसेनानी एन्.शिवराज, प्रकाशक - नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२.

१२) टावरे रमेश - माणगाव परिषद, ६१ वा स्मृती महोत्सव विशेषांक, प्रकाशक - रमेश टावरे, कोल्हापूर, १९८२.

१३) पतंगे रमेश(संपादक) - नामांतर, प्रकाशक - पतंगे रमेश, मुंबई, १९९४.

१४) परब अ.ज. - डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक चिंतन एक प्रगटन, प्रकाशक - अनिल मेहता, पुणे, १९७१.

१५) पवार उर्मिला/ मुन मिनाक्षी - आम्हीही इतिहास घडवला, प्रकाशक - स्त्रि उवाच, मुंबई, १९८९.

१६) पाटील भिकशोठ ज्ञानदेव - "कोल्हापूरची मोठी माणसं", प्रकाशक - कल्पक प्रकाशन मंदिर, कोल्हापूर, १९८३.

१७) पानतावणे गंगाधर - "वादळाचे वंशज", प्रकाशन - नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९८९.

१८) भिडे बी.एल./ - "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास", फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८.

१९) मुन वसंत(संपादक) - "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक, प्रकाशक- शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, १९९२.

२०) मेठासे कृष्णा - "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व चळवळी, प्रकाशक - लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९२.

२१) मंगुडकर मा.प. - कर्मवीर शिंदे यांचे जीवन व कार्य, प्रकाशक - मंगुडकर सुवर्णा, पुणे, १९७६.

२२) वराळे बळवंत - "डॉ. आंबेडकरांचा सांगाती", श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८८.

२३) लिंबाळे शरणकुमार (संपादक) - "दलित पँथर", सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९.

२४) लिंबाळे शरणकुमार - "प्रज्ञासुर्य", प्रकाशक - नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९१.

२५) लिंबाळे शरणकुमार (संपादक) - "भारतीय रिपब्लिकन पक्ष", प्रकाशक - नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९२.

२६) साळुंखे पी.बी. (संपादक मंडळ) - राजर्षि शाहू महाराज गौरव ग्रंथ, प्रकाशक - शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई, १९७६.

२७) सुर्यवंशी गणपतराव - "राजा शाहू आणि समाजप्रबोधन", रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८.

२८) क्षिरसागर आर.के. - भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रकाशक - पी.एस. चिक्कलठाणकर, औरंगाबाद, १९७९.


.......